दैनिक

जनप्रभात

सामाजिक परिवर्तनाचा बुलंद आवाज

मुख्य संपादक :- राहुल गजरे

कार्यकारी संपादक :- अवधूत शेंद्रे



✻ (आष्टी) वर्धा ✻ बुधवार, दि.१९ फेब्रुवारी २०२५ ✻ वर्ष ३ रे ✻ अंक १३१ ✻ पृष्ठ ६ ✻ मुल्य ५.०० RNI NO : MAHAR/2020/82242

नागपूरमध्ये व्हेरिएबल एनर्जी सायक्लोट्रॉन सेंटर साकारणार : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

कृतीगट स्थापन करण्याचे निर्देश ; कॅन्सर रुग्णांवर उपचार व संशोधन क्षेत्रासाठी केंद्र महत्त्वपूर्ण

वृत्तसंस्था ■ नागपूर



नागपूर : पार्टीकल ॲक्सीलरेटर (कण त्वरक) तंत्रज्ञान पूर्वी संशोधनापुरतेच मर्यादित होते. आता ते कॅन्सर सारख्या आजारावर उपचार तसेच शिक्षणाच्या नव्या ज्ञानशाखासह एक सामाजिक गरज झाली आहे. भारतात सद्यस्थितीत अवघी २४ सायक्लोट्रॉन केंद्र कार्यान्वित असून पाश्चिमात्य राष्ट्राच्या तुलनेत विचार करता आणखी एक हजार केंद्राची आवश्यकता आहे. नागपूर येथे विविध वैद्यकीय व अभियांत्रिकी पायाभूत संस्था असून सायक्लोट्रॉन केंद्र साकारण्यासाठी एक कृतीगट स्थापण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. याचबरोबर या प्रकल्पासाठी जागेच्या उपलब्धतेसंदर्भात प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

नागपूर येथे सायक्लोट्रॉन केंद्राच्या उभारणीबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली रामगिरी शासकीय निवासस्थानी बैठक झाली. या बैठकीस जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर, व्हीएनआयटीचे संचालक प्रेम लाल पटेल, प्रो. किशोर भूरचंडी, एम्सचे कार्यकारी संचालक डॉ. प्रशांत जोशी, शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. राज गजभिये, आयजीएमसीचे अधिष्ठाता डॉ. रवि चव्हाण, नॅशनल कॅन्सर इन्स्टिट्युटचे संचालक वैद्यकीय संचालक डॉ. आनंद पाठक, मुख्य कार्यकारी अधिकारी शैलेश जोगळेकर उपस्थित होते.

नागपूरमध्ये व्हीएनआयटी, एम्स, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, इंदिरा गांधी वैद्यकीय महाविद्यालय, नॅशनल कॅन्सर इन्स्टिट्यूट सारख्या आरोग्य क्षेत्रातील नावाजलेल्या पायाभूत संस्था आहेत. यादृष्टीने विचार करता हे केंद्र नागपूरसह मध्यभारतासाठी महत्वाचे ठरेल. या केंद्राद्वारे क्लीन एनर्जी, जलशुद्धीकरण, आरोग्य, ऊर्जा अन्य प्रक्रिया सारख्या औद्योगिक क्षेत्राची नवी दालने सक्षम होण्यास मदत होईल, असे एम्सचे कार्यकारी संचालक डॉ. प्रशांत जोशी यांनी सादरीकरणात सांगितले.

संशोधन, वैद्यकीय क्षेत्रासह कॅन्सरवरील उपचार, भौतिक विज्ञान व अभियांत्रिकी शिक्षण व औद्योगिक क्षेत्रासाठी हे केंद्र महत्वपूर्ण ठरेल, असे व्हीएनआयटीचे संचालक प्रेम लाल पटेल यांनी सांगितले. मध्य भारतातील आवश्यक अशा या केंद्राच्या उभारणीसाठी व्हीएनआयटी सर्वतोपरी योगदान देईल. व्हीएनआयटीमधून इलेक्ट्रॉनिक्स, भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र या क्षेत्रात रस घेणारे संशोधक पुढे आले आहेत. असे श्री. पटेल यांनी सांगितले.

नॅशनल कॅन्सर इन्स्टिट्यूटचे संचालक डॉ. आनंद पाठक यांनी मध्य भारतासह विदर्भ-मराठवाड्यातील कॅन्सर रुग्णांना याद्वारे होणाऱ्या लाभासंदर्भात सादरीकरण केले.

मोकाट श्वानांची संख्या नियंत्रित ठेवण्यासाठी चंद्रपूरमध्ये विशेष मोहीम

वृत्तसंस्था ■ चंद्रपूर

चंद्रपूर शहरात आठ ते नऊ हजार बेवारस श्वान आहेत. या मोकाट, बेवारस, भटके श्वान यांची संख्या नियंत्रित ठेवणे, रेबीज निर्मुलन व मनुष्य - प्राणी संघर्ष टाळणे या दृष्टीने चंद्रपूर महापालिकेद्वारे श्वान लसीकरण व निर्बीजीकरणाची मोहीम सुरु आहे. याअंतर्गत ४०२० मोकाट श्वानांचे निर्बिजीकरण (नसबंदी) तज्ञ डॉक्टरांद्वारे करण्यात आले आहे.

मोकाट, भटके श्वान ही अनेक ठिकाणची गंभीर समस्या आहे. गाडीच्या मागे धावणे, चावा घेणे, रात्रीच्या वेळेस अंगावर धाऊन जाणे त्यामुळे अपघात होणे इत्यादी प्रकारचे त्रास या बेवारस श्वानांमुळे होतात. श्वानांच्या चाव्यामुळं, अनेकांना प्राण गमवावे लागतात किंवा रेबिजपासून वाचण्यासाठी अनेक इंजेक्शन टोचून घ्यावे लागतात. प्राणी क्लेश प्रतिबंधक कायदा १९६० व ?निमल बर्थ कंट्रोल २००१ नुसार श्वानांना मारण्यास बंदी आहे. मात्र मोकाट, भटके श्वान यांची संख्या दिवसेंदिवस वाढतच जाते. यावर नियंत्रण आणण्यासाठी चंद्रपूर महापालिकेव्दारे सदर मोहीम राबविली जात आहे. शहरातील मोकाट श्वानांची नसबंदी करण्याची जबाबदारी पेटानिटी अँड ?निमल रिहॅबिलिटेटर्स (प्यार) फाऊंडेशनकडे सोपविण्यात आली आहे. शहरात अंदाजे ८ ते ९ हजार बेवारस श्वान असुन त्यांच्या संख्येत वाढ होत असल्याने निर्बीजीकरणाचे काम हाती घेण्यात आले आहे. मनपातर्फे आतापर्यंत ४०२० श्वानांचे निर्बिजीकरण करण्यात आले आहे. शहरातील मोकाट श्वानांचे निर्बिजीकरण हे तज्ञ डॉक्टरांद्वारे निःशुल्क करण्यात येत आहे.

जलयुक्त शिवार अभियानातून महाराष्ट्र जलक्रांतीच्या दिशेने : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

मृद व जलसंधारण विभागात रूजू झाले ६०१ अधिकारी, मुख्यमंत्र्यांचे हस्ते नियुक्तीपत्राचे वितरण

वृत्तसंस्था ■ मुंबई



मुंबई : राज्यात जलसंधारण विभागाच्या माध्यमातून राबविण्यात येत असलेले जलयुक्त शिवार अभियान हे महत्वाकांक्षी अभियान असून. या अभियानाच्या माध्यमातून राज्यात लोकसहभागातून झालेली कामे ही जलक्रांतीच्या दिशेने पडलेले पाऊल आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

मृद व जलसंधारण विभाग अंतर्गत आयोजित जलसंधारण अधिकारी गट ब (अराजपत्रित) नियुक्ती पत्राचे (ॲरिमोटद्वारे ऑन लाईन पदध्दतीने) वितरण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे हस्ते करण्यात आले. तर प्रातिनिधीक स्वरुपात सहा उमेदवारांना प्रत्यक्ष नियुक्ती आदेशाचे वितरण करण्यात आले.

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान येथील सभागृहात झालेल्या या समारंभास मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड, राज्यमंत्री इंद्रनील नाईक, मृद व जलसंधारण विभागाचे सचिव गणेश पाटील, आयुक्त प्रकाश खपले यांच्यासह नवनियुक्त अधिकारी व त्यांचे कुटुंबीय उपस्थित होते.

जलसंधारण विभागामध्ये निवड झालेल्या या ६०१ अधिकाऱ्यांचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, जलसंधारण विभाग हा शेतकऱ्यांच्या जीवनामध्ये परिवर्तन घडवणारा विभाग आहे. या विभागाच्या परिवारामध्ये नवनियुक्त अधिकाऱ्यांनी सामान्य माणूस व शेतकऱ्यांच्या जीवनात परिवर्तन घडविण्याचे ध्येय बाळगावे. शासनाच्या माध्यमातून सामान्यांची सेवा करण्याची आपणास संधी मिळाली आहे. या संधीचे सोनं करून जनसामान्यांच्या चेहऱ्यावर हसू फुलवावे. राज्यात ७५ हजार हजार नोकर भरती करण्यास सुरुवात केली. प्रत्यक्षात १ लाख ५० हजार नोकर भरती होत असल्याचे त्यांनी सांगितले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, राज्यातील ग्रामीण भागात पाणीटंचाई दूर करून शाश्वत शेतीसाठी पाण्याची उपलब्धता निर्माण करणे हा जलयुक्त शिवार अभियानाचा मुख्य उद्देश आहे. या अभियानाच्या माध्यमातून राज्यातील गावे जलयुक्त झाली असून भूजल पातळीत वाढ झाली आहे. शेतकऱ्यांना सिंचनासाठी पाणी उपलब्ध झाले, ज्यामुळे पीक उत्पादनात वाढ झाली. भूजल पातळीत वाढ झाल्याने शेतकऱ्यांना दोन्ही हंगामात पीक घेता येऊ लागली हे या अभियानाचे यश आहे.

जलयुक्त शिवार योजना राज्याच्या जलसंधारणासाठी एक महत्त्वाचा टप्पा ठरली. या योजनेच्या कामांमुळे देशात महाराष्ट्रात भूजल पातळी वाढ झाल्याचे केंद्र शासन व उच्च न्यायालयानेही त्यांच्या अहवालात मान्य केले आहे. भविष्यात ही योजना अधिक काटेकोरपणे, नियोजनबद्ध तंत्रज्ञानाधारित आणि स्थानिक सहभाग घेऊन अधिक प्रभावीपणे राबविण्यात येणारे असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

मृद व जलसंधारण मंत्री राठोड म्हणाले, मुख्यमंत्री फडणवीस यांच्या दूरदृष्टीतून राज्यात सुरू झालेल्या जलयुक्त शिवार अभियानाने क्रांती घडवून आणली. शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावणे हा जलयुक्त शिवार अभियानाचा मुख्य उद्देश असून या अभियानात मिळालेला लोकसहभाग हे या अभियानाचे यश असल्याचे श्री. राठोड यांनी सांगितले.

नवनियुक्त अधिकाऱ्यांमुळे जलसंधारण विभागातील कामांना अधिक गती मिळेल असा विश्वास श्री. राठोड यांनी व्यक्त केला. जलसंधारण विभागाने अत्यंत पारदर्शक पद्धतीने ही भरती प्रक्रिया पूर्ण केली. नवनियुक्त अधिकाऱ्यांनी जनतेच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी काम करावे, असे आवाहन त्यांनी केले.

मृद व जलसंधारण राज्यमंत्री श्री. नाईक म्हणाले, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात व मार्गदर्शनाखाली जलयुक्त शिवार अभियानात देशात आदर्शवत असे काम झाले आहे. जलसंधारण विभागामध्ये नवनियुक्त अधिकाऱ्यांनी लोकांच्या जीवनात परिवर्तन घडवण्यासाठी काम करण्यासाठी कटिबद्ध राहण्याचे श्री. नाईक आवाहन केले. सचिव गणेश पाटील यांनी प्रास्ताविक केले तर आभार आयुक्त प्रकाश खपले यांनी मानले.

मराठी साहित्य दृकश्राव्य माध्यमांवर उपलब्ध करा : उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

वृत्तसंस्था ■ मुंबई



मुंबई : मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतर आता तिचा प्रचार आणि प्रसार व्यापक प्रमाणात व्हावा, यासाठी राज्य सरकारकडून महत्वपूर्ण पावले उचलली जात आहेत. मराठी भाषा विभागाने मराठी साहित्य दृकश्राव्य माध्यमांवर उपलब्ध करून द्यावे, असे निर्देश उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले.

मराठी भाषा विभागाची बैठक सह्याद्री अतिथीगृह येथे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली झाली. या बैठकीस मराठी भाषा मंत्री उदय सामंत, आमदार दीपक केसरकर, उपमुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव असीमकुमार गुप्ता, प्रधान सचिव नवीन सोना, मराठी भाषा विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी, सहसचिव नामदेव भोसले, भाषा संचालक विजया डोणीकर, साहित्य संस्कृती मंडळाच्या सचिव मीनाक्षी पाटील तसेच राज्य मराठी विकास संस्थेचे संचालक डॉ. श्यामकांत देवरे आदी वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री शिंदे यांनी मराठी साहित्य दृकश्राव्य माध्यमांवर आणण्याच्या गरजेवर भर दिला. 'जागतिक स्तरावरील मराठीप्रेमी यांना साहित्याची ओळख व्हावी, यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर गरजेचा आहे. दृकश्राव्य स्वरूपात साहित्य उपलब्ध झाल्यास ते सहजतेने लोकांपर्यंत पोहोचू शकेल,' असे त्यांनी सांगितले.

मराठी भाषेचा जागतिक स्तरावर विस्तार करण्यासाठी सुमारे ५०० बृहमंडळे कार्यरत आहेत. या बृहमंडळांमार्फत मराठी साहित्याचा प्रसार होण्यासाठी प्रत्येक बृहमंडळाला ५०० मराठी पुस्तके प्रदान करण्याबाबत यावेळी चर्चा करण्यात आली. यामुळे परदेशातही मराठी भाषेची गोडी वाढेल, असा विश्वास उपमुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला. परदेशात ज्याठिकाणी बृहन महाराष्ट्र मंडळ आहेत तेथे छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा बसविण्याबाबत कार्यवाही करण्याबाबत विभागाने कार्यवाही करण्याचे उपमुख्यमंत्र्यांनी सांगितले.

मराठी भाषा जतन, संवर्धन व प्रचारासाठी विविध आधुनिक उपक्रम राबवण्याच्या सूचना उपमुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी यावेळी केल्या. मराठी भाषा येत नसलेल्या नागरिकांना मराठीबद्दल माहिती व्हावे, यासाठी रेल्वे स्थानके, बस स्थानके इत्यादी ठिकाणी क्यूआर कोड तयार करावेत. मराठीची जास्तीत जास्त पुस्तके इंटरनेटवर उपलब्ध करून देण्याची सूचनाही उपमुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी केली.

नागपूर येथील मेडिट्राना हॉस्पिटलच्या दुर्व्यवस्थेची तातडीने चौकशी करावी : महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे

नगरविकासच्या सहसचिवांच्या अध्यक्षतेखालील समितीने १५ दिवसांत अहवाल देण्याचे निर्देश

वृत्तसंस्था ■ मुंबई



मुंबई : नागपूर येथील मेडिट्राना हॉस्पिटलकडे अग्निशमन ना हरकत प्रमाणपत्र नसणे तसेच इमारत बांधकामामध्ये अनियमितता असूनही हॉस्पिटल सुरू ठेवण्यासाठी जबाबदार असणाऱ्या नागपूर महानगरपालिकेतील संबंधित उपायुक्त, वैद्यकीय अधिकारी, नगररचनाकार यांची नगरविकास विभागाच्या सहसचिवांच्या अध्यक्षतेखालील समितीमार्फत १५ दिवसांत चौकशी करण्यात यावी, असे निर्देश महसूल मंत्री तथा नागपूर जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले.

मेडिट्राना हॉस्पिटलसंदर्भातील अनियमिततेबाबत आमदार विकास ठाकरे यांनी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने महसूल मंत्री श्री. बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात बैठकी झाली. या बैठकीस नागपूर महानगरपालिका आयुक्त अभिजित चौधरी दूरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित होते.

पालकमंत्री श्री. बावनकुळे यांनी 'मेडिट्राना' बाबतच्या तक्रारीचा सविस्तर आढावा घेतला. श्री. बावनकुळे म्हणाले, हॉस्पिटल हे रुग्णांच्या सेवेसाठी असते. कोणतीही दुर्घटना घडू नये यासाठी त्यांनी सुरक्षा नियमांचे पालन करणे अत्यावश्यक आहे. बांधकाम अनियमितता अथवा अग्निशमन ना हरकत नसणे ही गंभीर बाब आहे. हॉस्पिटल बंद करणे हा शासनाचा उद्देश नसून ते सुस्थितीत कार्यरत राहणे गरजेचे असल्याने त्यांना कायद्यानुसार नोटीस देऊन एका महिन्यात त्यातील त्रुटी पूर्ण करून घ्याव्यात. याचबरोबर या पार्श्वभूमीवर नागपूर शहरातील सर्व रुग्णालयांची तपासणी करण्यात यावी, असे निर्देशही त्यांनी दिले.

अनियमिततेसंदर्भात मेडिट्राना हॉस्पिटलबाबत तक्रार प्राप्त झाल्याच्या अनुषंगाने बॉम्बे नर्सिंग ॲक्ट १९४९ नुसार हॉस्पिटलला नोटीस देऊन त्रुटींची पूर्तता करून घ्यावी, असेही बावनकुळे यांनी स्पष्ट केले.

नगरविकास विभागाच्या सहसचिवांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या चौकशी समितीमध्ये आरोग्य विभागाचे सहसचिव तसेच अग्निशमन विभागाचे अधिकारी यांचा समावेश करावा, असे आदेशही त्यांनी यावेळी दिले.

आष्टीत नगरपंचायत मध्ये राजकीय उलथापालथ ?

न.पं.उपाध्यक्ष जाकीर हुसेन व रेहान कुरेशी, सुरजुसे यांचा सभापती पदाचा राजीनामा; स्थायी समितीच्या निवडणुकीवर जनशक्ती संघटनेचा बहिष्कार

आष्टी (श) वर्धा ■ राहुल गजरे



वर्धा - आष्टी :- येथील नगरपंचायत मध्ये राष्ट्रीय कांग्रेस पक्ष्या सोबत युती करून सत्तेत असलेल्या जनशक्ती संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी आपला राजीनामा दिल्याने वर्धा जिल्ह्यातील राजकारणात खळबळ उडाली आहे. जनशक्ती संघटनेच्या वतीने दिलेल्या प्रसिद्धी पत्रकानुसार आष्टी शहराच्या विकासाला केंद्र बिंदू मानून आष्टी शहराचा कायापालट करण्याचे हेतूने सरकार स्थापन केले जनशक्ती संघटना आष्टी तालुका यांनी उपाध्यक्ष पद व अन्य दोन सभापती पदे घेऊन सत्तेमध्ये सहभागी झाले यामध्ये जनशक्ती संघटना यांनी सामाजिक दायित्व जपून आष्टी शहरातील प्रत्येक प्रभागाचा विकास व्हावा या प्रामाणिक हेतूने सत्तेत सहभाग घेतला. तसेच सर्वसामान्य नागरिकांच्या त्यांच्या प्रश्नांना विविध आंदोलनाचे माध्यमातून अनेक प्रश्न मार्गी लावले आहे तालुक्यात विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणारी एक सामाजिक संघटना म्हणून जनशक्ती संघटनेचा नावलौकिक आहे व त्याच कामाची पावती म्हणून जनसामान्य नागरिकांनी जनशक्ती संघटनेचे नगरसेवक यांना निवडून दिले. परंतु सत्ता स्थापन होऊन तीन वर्षाचा कालावधी झाला. या कालावधी दरम्यान आष्टी शहरातील पाणीपुरवठा योजनेचा प्रश्न वगळता कोणतेही विकासात्मक कामे झालेली नाही व समोर कामे होईल असे वाटत नाही स्वतः जनशक्ती संघटनेच्या निवडून आलेल्या नगरसेवकांच्या प्रभागातही कोणतीही विकासात्मक काम झालेले नाही. या सर्व बाबी लक्षात घेऊन जनशक्ती संघटनेचे उपाध्यक्ष जनाब जाकीर हुसेन व दोन सभापती आज दिनांक १८/०२/२०२५ रोजी यांनी राजीनामा दिला आहे असे म्हटले आहे

विकासात्मक कामाची हमी

आष्टी शहराच्या विकासात्मक कामासाठी युती करून सत्य सहभागी झालो मात्र अपयश आले त्यामुळे पुढील कार्य सत्तेबाहेर राहून विविध आंदोलनात्मक पद्धतीने शहरातील प्रलंबित विविध विकास कामे व सर्व प्रश्नांना न्याय मिळवून देईल अशी हमी संघटनेतर्फे देण्यात येत आहे असे जनशक्ती संघटना तालूकाध्यक्ष विक्की माहुरे तालूका उपाध्यक्ष पवन गुल्हाने शहराध्यक्ष कार्तिक भोंडे यांनी कळविले आहे.

विकासात्मक कामे व्हावीत म्हणून सत्तेत सहभागी झालो परंतु तीन वर्षात नगरसेवक यांच्या स्वतः च्या वार्ड मधील सुद्धा काम झाले नाही तर उपाध्यक्ष पद व सभापती पद हे फक्त अधिकार नसलेले शोभा असल्याने आम्ही पदाचे राजीनामे दिलेत.

मकरंद देशमुख
अध्यक्ष जनशक्ती संघटना आष्टी

टोरेस गुंतवणूकदारांना सहा महिन्यांत ४० कोटींपर्यंत मिळण्याची शक्यता

वृत्तसंस्था ■ मुंबई



मुंबई : टोरेस गैरव्यवहारप्रकरणी आतापर्यंत ३५ कोटी रुपयांची मालमत्ता जप्त करण्यात आली असून त्याशिवास टोरेस कंपनीशी संबंधित छोट्यामोठ्या वस्तू, सात-आठ मोटारगाड्या व महागडे खडे जप्त करण्याची परवानगी आर्थिक गुन्हे शाखेने न्यायालयाकडे मागितली आहे. याशिवाय याप्रकरणी सक्षम अधिकारी नियुक्ती करण्याबाबतही प्रक्रियेला सुरुवात करण्यात आली आहे. त्यामुळे आगामी सहा महिन्यांत सर्व प्रक्रिया संपवून तक्रारदारांना रक्कम परत करण्याच्या प्रक्रियेला सुरुवात होण्याची शक्यता आहे.

टोरेस प्रकरणात आतापर्यंत ३५ कोटी रुपयांची मालमत्ता जप्त करण्यात आली आहे. तसेच टोरेस कंपनीशी संबंधित फर्निचर, विद्युत वस्तू, सात ते आठ मोटरगाड्या व दीड कोटी रुपयांचे मौल्यवान खडे यांची माहिती आर्थिक गुन्हे शाखेला मिळाली आहे. ते जप्त करण्याबाबत एमपीआयडी न्यायालयाकडे परवानगी मागण्यात आली आहे. त्याशिवाय याप्रकरणी जिल्हाधिकाऱ्यांना सक्षम अधिकारी म्हणून नेमण्याच्या प्रक्रियेला सुरुवात करण्यात आली आहे. त्यासाठीही परवानगी मागण्यात आली आहे. याप्रकरणी आतापर्यंत १२ हजार ७८३ गुंतवणूकदारांची १३० कोटी रुपयांची फसवणूक झाल्याचे निष्पन्न झाले आहे. आरोपींनी परदेशातही अशाच प्रकारे कंपनी स्थापन केली असून तेथेही गुंतवणूक योजना राबवत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली आहे. त्याबाबत तपास सुरू आहे.

संपादकीय...

यांनाही सरळ कराच!

"राज्यपालांचे अधिकार संविधानापेक्षा अधिक नाहीत" असे स्पष्ट मत नोंदवण्याची वेळ न्यायपालिकेवर आली आहेच. सर्वोच्च न्यायालयाने दोन अत्यंत महत्त्वाच्या मुद्द्यांस हात घातला असून ते तडीस नेल्यास काही मूलभूत बदल घडू शकतील. यातील पहिला मुद्दा आहे लोकप्रतिनिधित्व कायद्याचा आणि दुसरा राज्यपालांच्या वर्तनाचा. या विषयाचे गांभीर्य लक्षात घेता त्यावर भाष्य गरजेचे. भ्रष्टाचार वा अन्य गंभीर गुन्ह्याखाली एखाद्यास शिक्षा झाल्यास त्यास भविष्यात सरकारी नोकरीचे दरवाजे कायमचे बंद होतात. अशी गुन्हा सिद्ध झालेली व्यक्ती कोणत्याही सरकारी कार्यालयात साध्या शिपायाची नोकरी करण्यासही अपात्र ठरते. मात्र अशी शिक्षा झाल्यानंतर सहा वर्षांनी सदर व्यक्ती लोकप्रतिनिधी कशी काय होऊ शकते, असा कळीचा मुद्दा सर्वोच्च न्यायालयाने उपस्थित केला असून या प्रकरणी केंद्र सरकार आणि निवडणूक आयोगास नोटिसा बजावल्या आहेत. सर्वोच्च न्यायालय या मुद्द्याचा फडशा पाडू इच्छिते असे दिसते. याचे कारण आमच्या नोटिशींस उत्तर आले नाही तरी या प्रकरणी सुनावणी सुरू राहील असे न्यायालयाने स्पष्ट केले असून त्यासाठी ४ मार्च ही तारीख न्यायालयाने मुक्रर केली. सर्वोच्च न्यायालयाचे न्या. दीपंकर दत्ता आणि मनमोहन यांनी या नोटिसा बजावल्या. सर्वोच्च न्यायालयाचा हा पवित्रा पाहून विविध शासकीय यंत्रणांनी त्यात आपले म्हणणे मांडण्याची इच्छा व्यक्त केली. याचा अर्थ सर्वोच्च न्यायालय 'रिप्रेझेंटेशन ऑफ द पीपल ॲक्ट' म्हणजे लोकप्रतिनिधित्व कायद्याच्या दोन कलमांत बदल करू पाहते असा लावला जात असून तसे झाल्यास ही मोठी घटना ठरेल. हे पहिल्यांदाच होते आहे असे नाही. याआधीही निवडणूक लढवू इच्छिणाऱ्यांस संपत्ती आणि गुन्हे यांचा तपशील प्रतिज्ञापत्राद्वारे देणे बंधनकारक करण्याचा तसेच कोणत्याही गुन्ह्यात दोन वर्षे शिक्षा झाल्यास खासदारकी/आमदारकी आपोआप रद्द होईल असा निर्णय सर्वोच्च न्यायालयानेच दिलेला आहे. याचा अर्थ लोकप्रतिनिधित्व कायद्यात याआधी दोन चांगल्या सुधारणा सर्वोच्च न्यायालयामुळेच झालेल्या आहेत. प्रत्यक्षात आल्यास ही आता तिसरी सुधारणा ठरेल. कोणताही सच्चा लोकशाहीप्रेमी या हस्तक्षेपाचे स्वागतच करेल. तथापि ते करताना आपल्या न्यायिक व्यवस्थेस अधिक निःस्पृह आणि अधिक निष्पक्ष व्हावे लागेल. असे नमूद करण्याची गरज म्हणजे सध्या विरोधी पक्षीय नेत्यांविरोधात खटल्यांवर खटले दाखल करण्याची नवी राजकीय संस्कृती. अलीकडे काही राजकीय पक्षांचे विरोधकांचा केवळ निवडणुकीय पराभव करून समाधान होत नाही. या विरोधकांस वैयक्तिक आणि सामाजिक आयुष्यातून कसे संपवता येईल याचा नुसताच विचार केला जातो असे नाही तर त्याप्रमाणे मार्ग चोखाळले जातात. दिमतीला केंद्रीय यंत्रणा आहेतच. त्यामुळे सत्ताधीशांस विरोध करणाऱ्यांस राजकीय लढाईसाठी उसंत राहात नाही आणि ते या न्यायिक लढायांतच अर्थमेले होतात. त्याचमुळे; "न्यायिक प्रक्रिया हीच आपल्याकडे मोठी शिक्षा असते" (प्रोसेस इज द पनिशमेंट) असे उद्गार काढण्याची वेळ साक्षात माजी सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांच्यावर आली. अशा परिस्थितीत कोणत्या ना कोणत्या गुन्ह्यात विरोधकांस अडकवणे तितके अवघड राहात नाही. हे सर्व प्रत्यक्ष कोणा विशिष्ट राजकीय पक्षाकडून थेट होते असे नाही. पण या राजकीय पक्षाचे इतक्या संघटनांत इतके समर्थक आहेत की कोणीही उठून सत्ताधाऱ्यांस आडवे येणाऱ्यास आडवे करण्याचा हा उद्योग करू शकतो. त्यात निवडणूक आयोगाचा सरकारधर्म हा मुद्दा आहेच. एकेकाळी हिंदुत्वाच्या आधारे प्रचार केला म्हणून शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचा मताधिकार सहा वर्षांसाठी गोठवण्याचा निर्णय याच देशात घेतला गेला होता यावर विश्वास बसू नये; अशी आजची स्थिती. सर्व नियमांचा वरवंटा विरोधकांवरच फिरणार. अशा स्थितीत प्रमुख विरोधी नेते विविध आरोपांखाली दोषी ठरत गेले तर लोकशाहीच्या गळ्यालाच नख लागणार हे उघड आहे. तेव्हा आरोप सिद्ध झालेल्यांस लोकप्रतिनिधी बनता येऊ नये, हा सर्वोच्च न्यायालयाचा विचार स्तुत्य असला तरी त्याच्या अंमलबजावणीतील संभाव्य धोका दुर्लक्ष करू नये असा. तथापि राज्यपालांबाबत सर्वोच्च न्यायालयाने घेतलेल्या भूमिकेबाबत मात्र असा कोणताही धोका दिसत नाही. सर्वोच्च न्यायालयात न्या. जे. बी. पारडीवाला आणि न्या. महादेवन यांच्या पीठासमोर तमिळनाडू सरकार आणि राज्यपाल आर. एन. रवी यांच्या प्रकरणाची सुनावणी सुरू आहे. या रवींचा उदय चेन्नईच्या राजभवनात झाल्यापासून सरकार आणि राज्यपाल यांच्यात वारंवार खटके उडत असून प्रायः त्यास राज्यपालच जबाबदार दिसतात. मुख्यमंत्री स्टालिन यांच्या सरकारला जमेल तितके आडवे जाणे हा एकमेव मुद्दा या महामहिमांच्या कार्यक्रमपत्रिकेवर असावा. सरकारने, विधानसभेने पारित केलेल्या विधेयकाचे रूपांतर हे महामहीम सरळपणे कायद्यात होऊच देत नाहीत. अशी जवळपास १० विधेयके या महामहीम रवींनी कायदा होण्यापासून रोखली. वास्तविक सरकारने घेतलेल्या एखाद्या निर्णयावर राज्यपालांस काही आक्षेप असल्यास तो निर्णय सरकारकडे परत पाठवण्याचा अधिकार राज्यपालांस आहे. तसे झाल्यानंतरही विधानसभेने तो निर्णय तसाच्या तसा घेतला तर मात्र राज्यपालांस त्यावर सही करावी लागते. पण या महामहिमांचा खाक्याच वेगळा. सरकारने एखादे विधेयक मंजूर करून त्यांच्याकडे पाठवले तर ते बराच काळ त्यावर निर्णयच घेत नाहीत. हो नाही आणि नाहीही नाही. सरकारी निर्णय हे महामहीम जमेल तितका काळ उबवणार. त्यानंतर फारच बोंब झाली की तो निर्णय सरकारकडे परत पाठवणार. मग सरकार सर्व आवश्यक प्रक्रिया पुन्हा पूर्ण करून तो निर्णय या महामहिमांकडे पाठवणार. मग महामहीम पुन्हा त्याकडे दुर्लक्ष करणार आणि पुन्हा ओरडा झाला तर त्या निर्णयाचा चेंडू राष्ट्रपतींच्या अंगणात ढकलणार. म्हणजे निर्णय लटकला. राजकारणातील अतृप्त आत्म्यांस शांत करण्याचा मार्ग म्हणजे राज्यपालपद असे म्हणता येईल अशी सद्यःस्थिती. एकापेक्षा एक दिव्य महामहीम सध्या विविध राजभवनांत वास्तव्य करून आहेत. भाजपविरोधी सरकारची जमेल तितकी अडचण करणे हाच या महामहिमांचा एककलमी कार्यक्रम. महाराष्ट्रात भगतसिंग कोश्यारी यांनी घातलेला धिंगाणा याच जातकुळीतला. महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी या भगतसिंगास सहन केले. पण तमिळनाडूचे मुख्यमंत्री स्टालिन यांनी मात्र त्यांच्या महामहिमांस न्यायालयात खेचले. त्याची सुनावणी सर्वोच्च न्यायालयात सुरू असून न्यायाधीश उपस्थित करत असलेल्या प्रश्नांतून या महामहिमाचे पुरते वस्त्रहरण होताना दिसते. "तुम्ही विधेयक परत पाठवण्याची कारणे राज्य सरकारला सांगितलीत का", "तुम्हाला एखाद्या विधेयकावर निर्णय घ्यायला किती वेळ हवा", "तुमची स्वतःची वेगळीच कार्यपद्धती दिसते" अशा शेलक्या प्रश्नांद्वारे न्यायाधीश या महामहिमांच्या वर्तनातील नियमबाह्यता अशा प्रकारे दाखवून देत आहेत ती पाहिल्यावर माजी पोलीस अधिकारी असलेल्या या रवीने स्वतःहून राजभवनातून मावळायला हवे. पण तसे होण्याची काही शक्यता नाही. राजकारण्यांस लाजवेल इतके राजकारण अलीकडे राजभवनांतून खेळले जाते. त्याचमुळे "राज्यपालांचे अधिकार संविधानापेक्षा अधिक नाहीत" असे स्पष्ट मत नोंदवण्याची वेळ न्यायपालिकेवर आली. जे झाले ते योग्यच. पण ते तेथेच थांबू नये. राज्यपाल, त्या पदाची कार्यकक्षा, अधिकार आदींबाबत एकदाचा सोक्षमोक्ष काय तो लावायला हवा. ती वेळ आलेली आहे. देशाची घटनात्मकता आणि संघराज्य व्यवस्था अबाधित राखायची असेल तर या महामहिमांच्या उद्योगांस वेसण घालावी लागेल. राजकारण्यांना सरळ कराच, पण राजभवनी निवासींनाही सरळ करायची गरज आहे.

छत्रपती शिवाजी राजा आणि महाराष्ट्र माझा

(शिवजयंती उत्सव सप्ताह विशेष)



महाराष्ट्रच नव्हे तर अख्ख्या भारताचे लाडके छत्रपती शिवाजी महाराज हे शिवाजीराजा, शिवाजीराजे, शिवबा, शिवबाराजे, शिवराय अशा अनेक नावांनी ओळखले जातात. शिवरायांचा जन्मदिवस हा शिवजयंती म्हणून साजरा होतो. शिवाजीरिजे आणि त्यांचे पुत्र छत्रपती संभाजीराजे यांचा संयुक्त नामोल्लेख शिवशंभू असा होतो. सर्वसाधारणपणे इतिहासकार शिवाजी महाराजांचा जन्म- १६३० ते औरंगजेबाचा मृत्यू- १७०७ या ७७ वर्षांच्या काळास शिवकाल असे म्हणतात. शिव छत्रपतींबद्दल पुरेपूर माहिती लिहिण्याची आपली काय औकात? असे म्हणत श्री कृष्णकुमार गोविंदा निकोडे गुरूजी- अलककार यांनी शब्दबद्ध केलेले काही प्रसंगच वाचकांच्या सेवेत... संपादक.

शिवाजी महाराजांच्या जयंतीला महाराष्ट्रात 'शिवजयंती' म्हणतात. ती राज्यभर एखाद्या मोठ्या सणाप्रमाणे साजरी केली जाते. त्यांच्या जन्म दिनांकाबद्दल वाद असल्याने शिवजयंती महाराष्ट्रात वर्षभरात किमान दोनदा तरी साजरी होते. त्या दिवशी दिवसभर ढोल-ताशे वाजवीत मिरवणुका निघतात आणि शिवाजीच्या पुतळ्यांना हार घालण्याचा कार्यक्रम होतो. अनेक ठिकाणी शिवाजी महाराजांच्या जन्माच्या वेळी जी कालगणना प्रचलित होती त्यानुसार शिवाजी जयंती तिथीनुसार साजरी केली जाते. सन २००१ सालापासून १९ फेब्रुवारी या तारखेला सरकारी शिवजयंती साजरी होते. छत्रपती शिवाजीराजे भोसले, जे शिवराय म्हणूनही जगविख्यात आहेत. महाराष्ट्राच्या इतिहासाचे कोणतेही पुस्तक पाहिले तर मुखपृष्ठ हे छत्रपती शिवाजी महाराजांचेच दिसेल. कारण ते येथील मराठा साम्राज्याचे संस्थापक होते. भोसले कुळातील या राजाने विजापूरच्या आदिलशाही आणि मोगल साम्राज्य यांच्याविरुद्ध संघर्ष करून मराठा स्वराज्य स्थापन केले. रायगड ही राजधानी असलेले स्वतंत्र मराठा राज्य महाराजांनी उभे केले आणि इ.स. १६७४मध्ये छत्रपती म्हणून राज्याभिषेक करवून घेतला. शिस्तबद्ध लष्कर व सुसंघटित प्रशासकीय यंत्रणेच्या बळावर छत्रपती शिवाजी महाराजांनी एक सामर्थ्यशाली आणि प्रागतिक राज्य उभे केले. भूगोल-इतिहासाचे ज्ञाते, आश्चर्यजनक वेगवान हालचाली आणि बलाढ्य शत्रूंचे मनोधैर्य खच्चीकरणात नेमके हल्ले, यांचा वापर करणारे गनिमी काव्याचे तंत्र त्यांनी यशस्वीपणे हाताळले होते. आपल्या वडिलांकडून मिळालेल्या दोन हजार सैनिकांच्या छोट्या तुकडीपासून एक लाख सैनिकांचे लष्कर त्यांनी उभे केले. किनारे आणि अंतर्गत प्रदेशातील किल्ल्यांची डागडुजी करण्यासोबतच अनेक किल्लेही त्यांनी उभारले. राज्यकारभारात मराठी भाषेचा वापर करण्यास त्यांनी प्रोत्साहन दिले होते.

पुणे जिल्ह्यातील जुन्नर शहरानजीक वसलेल्या शिवनेरी या डोंगरी किल्ल्यावर दि. १९ फेब्रुवारी १६३० रोजी छ. शिवाजी महाराजांचा जन्म झाला. इतिहासाच्या अभ्यासांमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांची नेमकी जन्मतारीख हा एकेकाळी मतभेदांचा मुद्दा होता. तो वाद नंतर मिटला. महाराष्ट्र राज्य शासनाने फाल्गुन वद्य तृतीया शके १५५१ अर्थात शुक्रवार दि. १९ फेब्रुवारी १६३० ही शिवरायांची जन्मतारीख २००१ साली स्वीकारली. इतर संभाव्य तारखांमध्ये ६ एप्रिल १६२७- वैशाख शुद्ध तृतीया ही एक जन्मतारीख मानली जात होती. एका आख्यायिकेनुसार शिवनेरी गडावरील शिवाई देवीला माता जिजाईने आपल्याला बलवान पुत्र व्हावा, अशी प्रार्थना केली होती. म्हणून या मुलाचे नाव शिवाजी ठेवले गेले. त्यांच्या जन्माच्या वेळी दख्खनमधील राजसत्ता विजापूर, अहमदनगर आणि गोवळकोंडा या तीन मुसलमानी सल्तनतींमध्ये विभागलेली होती. शहाजीराजांनी आपली निष्ठा वेळोवेळी अहमदनगरची निजामशाही, विजापूरची आदिलशाही आणि मुघल यांच्यादरम्यान बदलली; पण त्यांनी पुणे ही नेहमीच आपली जहागिरी ठेवली आणि स्वतःची एक लहानशी फौज पदरी बाळगली होती. आई जिजाई छोट्या शिवबासह पुण्यात रहायला गेल्या. त्यावेळी पुण्याची फार दुरवस्था झालेली होती. तेव्हा छोटे शिवराय व कारभारी यांच्या हस्ते पुण्यात एका शेतात प्रतीकादाखल सोन्याच्या मुलाम्याचा नांगर फिरवून पुण्याची पुनःस्थापना करायला सुरुवात केली. शिवाजीराजे लहानाचे मोठे होत असताना आणि त्यानंतरही प्रत्येक महत्त्वाच्या प्रसंगी त्यांना जिजामातेनी खंबीर मार्गदर्शन केले. शिवाजी महाराजांच्या त्या आद्यगुरू होत. हिंदवी स्वराज्य स्थापनेचे स्वप्न साकार करायला त्यांना जिजाऊंनी स्फूर्ती दिली, असे काही इतिहासकार सांगतात. युद्धाभ्यास आणि रणनीती तसेच राजकारभार यासंबंधी प्राथमिक मार्गदर्शन त्यांना शहाजी राजांकडून दप्तर व न्यायव्यवस्थेचे शिक्षण, परकीय सत्तेविरुद्ध लढा देण्यात आवश्यक असलेल्या शिस्तीचे शिक्षण माता जिजाऊकडून मिळाले, असे उपलब्ध ऐतिहासिक माहितीवरून निश्चितपणे सांगता येते. जिजाऊंनी शिवबांच्या शिक्षणाची जबाबदारी घेऊन त्यांस युद्धकला व राजनीतिशास्त्राचे शिक्षण देवविले. शिवाय संत एकनाथ महाराजांच्या भावार्थ रामायण, भारूड आदींच्या माध्यमातून त्यांच्या मनात स्वराज्याचे स्फुल्लिंग चेतविले.

शिवरायांची राजमुद्राः छत्रपती शिवाजीराजे जेव्हा पुण्याचा कारभार पाहू लागले, तेव्हा त्यांनी स्वतःची स्वतंत्र राजमुद्रा तयार केली. ही राजमुद्रा संस्कृत भाषेत होती. ती अशी- 'प्रतिपच्चंद्रलेखेव वर्धिष्णुर्विश्ववंदिता शाहसुनोः शिवस्यैषा मुद्रा भद्राय राजते!' त्याचा मराठी अर्थ- 'ज्याप्रमाणे प्रतिपदेचा चंद्र वाढत जातो आणि साऱ्या विश्वात वंदनीय होतो. तशीच शहाजींचा पुत्र शिवाजींची ही मुद्रा व तिचा लौकिक वाढत जाईल!'

पन्हाळगडापासून काही अंतरावर वाटेत सिद्दीच्या सैन्याने त्यांना घोडखिंडीत गाठले आणि हातघाईची लढाई सुरू झाली. तेव्हा शिवाजीराजांचे विश्वासू पराक्रमी सरदार बाजीप्रभु देशपांडे यांनी शिवाजीराजांना विनंती केली, की त्यांनी विशालगडासाठी पुढे कूच करावी. खिंडीतील लढाई ते स्वतः लढतील. विशालगडावर पोहोचताच तोफांच्या तीन डागण्या ऐकू आल्या म्हणजे शिवाजीराजे सुखरूप गडावर पोहचले, असा संदेश मिळेल. बाजीप्रभु देशपांडे- यांनी वचन दिले, की जोपर्यंत तोफांचे तीन आवाज ऐकू येणार नाहीत, तोपर्यंत सिद्दी जौहरला खिंडीमध्येच झुंजवत ठेवतील. महाराजांना ते पटेना, पण बाजीप्रभूच्या विनंतीवजा हट्टापुढे त्यांनी यास मान्यता दिली आणि विशालगडासाठी कूच केली. बाजींनी सिद्दीच्या सैन्याला रोखून धरण्यासाठी प्रयत्नांची शर्थ केली, परंतु संख्येने कितीतरी पटीने अधिक सैन्यापुढे त्यांनी प्राणांची बाजी लावली. ते स्वतः प्राणांतिक रितीने घायाळ झाले होते. शेवटी सैनिकांनी मृत्युपथावर असलेल्या घायाळ बाजींना एके ठिकाणी आणून बसविले, मात्र बाजीप्रभूंचे प्राण कानाशी साठले होते. थोड्या वेळाने तोफांचे तीन आवाज ऐकू आले आणि शिवाजीराजे गडावर पोहोचल्याचा तो संदेश समजल्यावरच बाजीप्रभूंनी प्राण सोडले. शिवाजीराजांना ही बातमी फार चटका लावून गेली. बाजीप्रभू हे ज्या घोडखिंडीत लढले आणि स्वतःच्या प्राणांचे बलिदान दिले त्या घोडखिंडीचे नाव त्यांनी पावनखिंड असे बदलले. बाजीप्रभूंच्या बलिदानाने पावन झालेली ती पावनखिंड होती.

मोगल साम्राज्याचा नर्मदा नदीपलीकडे विस्तार करणे, तसेच शिवाजी महाराजांच्या राज्यविस्ताराला वेसण घालणे या दोन हेतूंसाठी औरंगजेबाने त्याचा मामा शाहिस्तेखान याला दख्खनच्या मोहिमेवर पाठविले. प्रचंड मोठा लवाजमा, सैन्य आणि फौजफाटा सोबत घेऊन शाहिस्तेखान निघाला आणि वाटेत असणाऱ्या प्रत्येक राज्यात, गावात त्याने दहशत पसरवीत जमेल तेवढा जमेल तेथे विध्वंस केला. शेवटी पुण्याजवळील चाकणचा किल्ला जिंकून पुण्यातील शिवरायांच्या लाल महालातच तळ ठोकला. महाराजांनी खानाचा बंदोबस्त करण्यासाठी एक धाडसी निर्णय घेतला. तो म्हणजे लाल महालात शिरून खानाला संपविण्याचा! लाल महालात आणि अवतीभोवती खडा पहारा आणि महालात शिरणे अतिशय जोखमीचे काम होते. एके रात्री जवळूनच जाणाऱ्या एका लग्नाच्या मिरवणुकीचा आधार घेऊन काही मोजक्या माणसांसह स्वतः शिवाजी महाराज लाल महालात शिरले. महालाचा कानाकोपरा माहीत असल्यामुळे लवकरच प्रत्यक्ष शाहिस्तेखानच्या खोलीत त्यांनी प्रवेश केला. तोपर्यंत महालात कोठेतरी झटापट सुरू झाल्यामुळे शाहिस्तेखानला जाग आली. तेवढ्यातच त्यांना समोर पाहून खानाने जीव वाचविण्यासाठी सरळ खिडकीतून खाली उडी घेतली. महाराजांनी चपळाईने केलेला वार हुकल्यामुळे खानाच्या प्राणावर बेतण्याऐवजी त्याची हाताची तीन बोटे कापली गेली. अनेकदा या गोष्टीचा अप्रत्यक्ष फायदा शिवराय किंवा त्यांच्या सैन्याला मिळाला. शत्रू सैन्यामध्ये ते घुसल्याच्या केवळ अफवा पसरवून संख्येने किरकोळ असलेल्या मावळ्यांनी संख्येने अनेक पटींनी मोठ्या सैन्याची उडविलेली दाणादाण ही याच गोष्टीची साक्ष देऊ शकते. इ.स. १६६३ सालचे शाहिस्तेखान प्रकरण शिवाजीराजांच्या जीवनात आणखी एका नाट्यमय प्रसंगाची भर घालून गेले.

शिवछत्रपतींच्या अशा अनेकानेक पराक्रमी व विजयी घोडदौडी झाल्या. त्यानंतर प्रदीर्घ आजारपणामुळे छ. शिवाजी महाराजांचा मृत्यू दि. ३ एप्रिल १६८० रोजी रायगड येथे झाला, असे सांगितले जाते.

!! शिवजयंती निमित्ताने शिव छत्रपतींना मानाचा मुजरा व सर्वांना प्रेरणादायी शिवमय हार्दिक शुभेच्छा!!



संकलन व सुलेखन -
श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजी. एक प्राणीप्रेमी.
रामनगर वॉर्ड, गडचिरोली.
फक्त व्हॉट्सॲप- ९४२३७१४८८३.

शिवनेरी...

दिला विश्वास
धन्य धन्य शिवनेरी
सूर्य उदेला तेजस्वी
आऊंचीकूस सोनेरी

कठोरदगडांची गादी
कष्टाचे स्वप्न भरजरी
बागडण्याच्या वयात
पेलली ढालतलवारी

आऊंची मांडी सोडी
मांड ठेवी घोड्यावरी
अवगत युध्दडावपेच
राज्य करतो मनावरी

स्वराज्य म-हाठ्यांचे
आस जिजाऊंचे उरी
झिजले चंदनअपारी
स्वप्नेच्छा मूर्त अपुरी

अखर्वात असाराजा
आऊ तुझे आभारी
पिढ्यांना मिळे उर्जा
सार्थ जीवना उभारी

रयत सुखस्थ संसारी
सुखे स्वराज्य चाकरी
फिरते आश्वस्त नारी
प्रत्येकमुखासभाकरी

शिव चरित्र वाचताना
शहारे गात्रे ही सारी
शिवबाजयंती साजरी
मनात कोरी शिवनेरी

- हेमंत मुसरीफ पुणे
९७३०३०६९९६.

राजे...

विश्वा
अखर्वात
महा पुरुष
जनला शीव स्वरूप
पिढ्या वरी कित्येक
उपकृत केलेत खूप

सांभाळे समर्थ सत्ता
स्वराज्यां मिळे रूप
आऊ तुझ्या स्वप्नांस
लाभले मूर्त स्वरुप

राजा दुजा स्वराज्यां
वाचाळ बसले चूप
चपराक बसे तयास
मनचं ज्यांचे विद्रुप

मावळा होई बावळा
आनंदे नाचला खूप
आले दिवस सुखाचे
रयत किती सुखरुप

लहरेभगवा आकाशी
आला सकला हुरुप
माझे हक्काचे राज्य
वाटते तयाचे अप्रुप

स्वराज्यकरू सुराज्य
जनता जाहली तद्रुप
अंबाभवानी धन्यवाद
दिला राजा सुस्वरूप

- हेमंत मुसरीफ पुणे.
९७३०३०६९९६

एटीएममध्ये ज्येष्ठांची फसवणूक करणारा चोरटा गजाआड, १४ लाखांचा मुद्देमाल जप्त; १६६ एटीएम कार्ड जप्त

वृत्तसंस्था ■ पुणे



पुणे : महिनाभरापासून शहराच्या वेगवेगळ्या भागात एटीएममध्ये पैसे काढणाऱ्या ज्येष्ठ नागरिकांना मदतीचा बहाणा करुन रोकड चोरणारा कर्नाटकातील चोरटा अखेर पोलिसांच्या जाळ्यात सापडला. विश्रामबाग पोलिसांनी कर्नाटकातील चोरट्याला अटक केली असून, त्याच्यकडून फसवणुकीचे १६ गुन्हे उघडकीस आले आहेत. त्याच्याकडून मोटार, दुचाकी, रोकड तसेच १६६ एटीएम कार्ड असा १४ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

राजू प्रल्हाद कुलकर्णी (वय ५४ रा. अलानहली, म्हैसुर कर्नाटक) असे अटक करण्यात आलेल्या चोरट्याचे नाव आहे. आरोपी राजू कुलकर्णी सराइत असून, त्याने २१ ज्येष्ठ नागरिकांची फसवणूक केल्याचे तपासात उघढकीस आले आहे. एटीएममधून पैसे काढणाऱ्या ज्येष्ठांना मदतीचा बहाणा करुन कुलकर्णी त्यांचे एटीएम कार्ड चोरायचा. त्यांच्याकडून सांकेतिक शब्द (पासवर्ड) जाणून घ्यायचा. त्यानंतर कुलकर्णी एटीएममधून पैसे निघत नाही, असे सांगून ज्येष्ठांना त्याच्याकडील बाद झालेले एटीएम कार्ड द्यायचा. ज्येष्ठांकडील एटीएम कार्ड चोरुन तो पसार व्हायचा. एटीएम कार्डचा गैरवापर करुन तो पैसे काढून घ्यायचा, अशी माहिती परिमंडळ एकचे पोलीस उपायुक्त संदीपसिंग गिल यांनी पत्रकार परिषदेत दिली.

विश्रामबाग पोलीस ठाण्याच्या हद्दीत गांजवे चौकात २ फेब्रुवारी रोजी एका बँकेच्या एटीएममधून पैसे काढणाऱ्या ज्येष्ठाची फसवणूक करण्यात आली होती. या गुन्ह्याचा तपास करण्यात येत होता. तांत्रिक तपासात आरोपी कुलकर्णीने ज्येष्ठाची फसवणूक केल्याचे उघडकीस आले. त्यानंतर कुलकर्णी कर्नाटकात पसार झाल्याची माहिती मिळाली. पोलिसांच्या पथकाने त्याला कर्नाटकातून ताब्यात घेतले. अतिरिक्त पोलीस आयुक्त प्रवीणकुमार पाटील, उपायुक्त संदीपसिंग गिल, सहायक आयुक्त साईनाथ ठोंबरे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजयमाला पवार, गुन्हे शाखेचे निरीक्षक अरुण घोडके, उपनिरीक्षक मनोज बरुरे, अशोक माने, मयूर भोसले, सचिन कदम, गणेश काठे, आशिष खरात, अर्जुन थोरात, राहुल मोरे, संतोष शेरखाने, नितीन बाबर, सागर मोरे यांनी ही कामगिरी केली.

'चालू तारखे'ला फसवणुकीचे गुन्हे

पुणे, पिंपरी-चिंचवड शहरात मोठ्या संख्येने सेवानिवृत्त ज्येष्ठ नागरिक राहायला आहेत. निवृत्ती वेतन महिन्याच्या पहिल्या आठवड्यात जमा होत असल्याने कुलकर्णी शहरातील वेगवेगळ्या भागातील एटीएम केंद्रांबाहेर पाळत ठेवायचा. ज्येष्ठ नागरिक एटीएम केंद्रात पैसे काढण्यासाठी गेल्यानंतर तो त्यांच्या पाठोपाठ एटीएममध्ये शिरायचा. हातचलाखी करुन तो त्याच्याकडील एटीएम कार्ड ज्येष्ठांना द्यायचा. ज्येष्ठांकडील कार्ड घेऊन तो त्यांच्या खात्यातून पैसे चोरायचा. गुन्हा केल्यानंतर तो कर्नाटकात पसार व्हायचा.

मैत्रिणीसोबत मौजमजा

आरोपी राजू कुलकर्णी याने एटीएममधून पैसे काढणाऱ्या ज्येष्ठ नागरिकांची फसवणूक केली. त्याने विश्रामबाग, बिबवेवाडी, सिंहगड रस्ता, कोथरुड, विश्रांतवाडी, शिवाजीनगर, सहकारनगर, तसेच आळंदी परिसरात फसवणुकीचे १६ गुन्हे केल्याचे उघडकीस आले. कुलकर्णी याने फसवणुकीतून मिळालेल्या पैसे मैत्रिणीसोबत मौजमजा करण्यासाठी खर्च केल्याची माहिती पोलीस उपायुक्त संदीपसिंग गिल यांनी दिली.

संशोधन आणि रोजगाराभिमुख शिक्षण प्रणालीला प्राधान्य : शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे



वृत्तसंस्था ■ मुंबई

मुंबई : राज्याच्या शालेय शिक्षण विभागामार्फत एनसीईआरटीचा अभ्यासक्रम स्वीकारताना राज्याशी संबंधित माहितीचा अंतर्भाव करून संशोधनाला प्राधान्य देणारी आणि रोजगाराभिमुख शिक्षण प्रणाली विकसित केली जाईल, असे प्रतिपादन शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी केले.

शालेय शिक्षण मंत्री तथा 'पाठ्यपुस्तक मंडळा'चे अध्यक्ष दादाजी भुसे यांनी महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ (बालभारती) च्या कामाचा मुंबईतील प्रभादेवी येथे बालभारतीच्या कार्यालयात झालेल्या बैठकीत आढावा घेतला. प्रधान सचिव रणजितसिंह देओल यावेळी उपस्थित होते. तर शालेय शिक्षण आयुक्त सचिंद्रप्रताप सिंग, 'एससीईआरटी' चे संचालक डॉ. राहुल रेखावार दूरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित होते. बालभारतीचे संचालक कृष्णकुमार पाटील यांनी बालभारतीच्या कार्यपद्धतीची सादरीकरणाद्वारे माहिती दिली.

शिक्षण मंत्री श्री. भुसे म्हणाले, आजचे विद्यार्थी हे देशाचे भविष्य आहे. त्यांना बालभारतीच्या माध्यमातून नियमित अभ्यासक्रमाबरोबरच रोजगाराभिमुख, कृषीविषयक माहिती देणाऱ्या, मातीशी नाते जोडून ठेवणाऱ्या, कला - क्रीडा विषयाची माहिती देणाऱ्या अभ्यासक्रमाची पुस्तके उपलब्ध करून दिली जात आहेत, ही समाधानाची बाब आहे. याचबरोबर विद्यार्थ्यांमध्ये संशोधक वृत्ती जोपासण्यासाठी संशोधनाला प्राधान्य देणारी शिक्षण प्रणाली विकसित केली जाईल. याव्यतिरिक्त नाविन्यपूर्ण उपक्रमांचीही अंमलबजावणी केली जाईल, असेही ते म्हणाले.

शालेय मंत्री श्री. भुसे यांनी बालभारतीच्या कामकाजाचा सविस्तर आढावा घेतला. अभ्यासक्रमाची पुस्तके थेट तालुका पातळीपर्यंत पोहोचवता येतील का याबाबत अभ्यास करण्याची सूचना त्यांनी केली. आधुनिक काळाची कास धरून बालभारतीचे कामकाज संपूर्ण संगणकआधारित करावे. बालभारतीच्या उत्पन्नामधून शैक्षणिक उपयुक्त उपक्रमांसाठी निधी खर्च करावा. केंद्राचा अभ्यासक्रम स्वीकारताना त्यात राज्याशी संबंधित माहितीचा समावेश करावा तसेच तो अभ्यासक्रम विद्यार्थी आवडीने शिकतील असा असेल, याची दक्षता घ्यावी अशा सूचना त्यांनी केल्या. श्री. भुसे यांच्या हस्ते यावेळी जर्मन भाषा शिकू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी तयार करण्यात आलेल्या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले.

प्रधान सचिव रणजितसिंह देओल, आयुक्त सचिंद्रप्रताप सिंग, एससीईआरटी चे संचालक डॉ. राहुल रेखावार यांनी यावेळी शालेय शिक्षण अभ्यासक्रमातील विविध उपक्रमांची माहिती दिली.

जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकला शेतकऱ्यांचा मोर्चा जिल्हा प्रशासनास विविध मागण्यांचे निवेदन सादर

परभणी ■ वसंत आवटे



परभणी : शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी मंगळवारी दि.१८ सकाळी शेतकऱ्यांच्यावतीने जिल्हाधिकारी कार्यालयावर भव्य मोर्चा काढण्यात आला. या मोर्चात मोठ्या संख्येने शेतकरी सहभागी झाले होते.

जिल्ह्यातील ५२ महसूल मंडळातील लाखो शेतकऱ्यांचा खरीप २०२४ सोयाबीन, तूर, कापूस आदी पिकांचा अग्रीम, वैयक्तिक तक्रारी व इतर ५०० कोटी रुपयाचा पिक विमा आयसीसीआय लोम्बार्ड कंपनीकडे थकीत आहे. पाठपुरावा करून सुद्धा पिक विमा कंपनी शेतकऱ्यांना दाद देत नसल्याच्या निषेधार्थ हा मोर्चा काढण्यात आला. डॉ. सुभाष कदम, हेमचंद्र शिंदे, विश?वंभर गोरवे, गोविंद लांडगे यांच्या नेतृत्वाखाली मोंढा मार्केट कमिटीपासून या मोर्चास प्रारंभ झाला. येथून हा मार्चा जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकला. यावेळी जिल्हाधिकारी तथा पंतप्रधान पिक विमा जिल्हास्तरीय समिती अध्यक्ष यांना मागण्यांचे निवेदन देण्यात आले. त्याद्वारे, पिकविमा नुकसान भरपाई देण्यास जाणीवपूर्वक विलंब करुन कायदेभंग केल्याबद्दल आयसीआयसीआय लोम्बार्ड विमा कंपनीवर गुन्हे दाखल करून काळ्या यादीत टाकावे. जिल्हयातील लाखो शेतकऱ्यांचे आयसीआयसीआय लोम्बार्ड पिक विमा कंपनीकडे खरीप हंगाम २०२४ मधील थकलेली २५ टक्के अग्रीन पिक विमा नुकसान भरपाई, स्थानिक आपत्ती व काढणी पश?चात नुकसान अंतर्गत भरपाई व पीक कापणी प्रयोगावर आधारित नुकसान भरपाई अशी एकूण ५०० कोटी रुपयांपेक्षा जास्त रक्कम आठ दिवसांत शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्यात यावी. शेतकऱ्यांप्रति उदासीन असलेल्या प्रभारी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांना निलंबित करून पूर्णवेळ जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांची तात्काळ नेमणूक करण्यात यावी. खरीप हंगाम २०२४ मध्ये जिल्ह्यातील शेवटच्या शेतकऱ्याने उत्पादित केलेले सोयाबीन खरेदी होण्याकरिता ऑनलाइन नोंदणी नव्याने सुरू करून संपूर्ण सोयाबीन खरेदीची व्यवस्था निर्माण करण्यासाठी मुदतवाढ देण्यात यावी. पंतप्रधान पिक विमा योजनेत कोणत्याही सुधारणा करण्यापूर्वी प्रत्येक जिल्हयातील शेतकऱ्यांना विश?वासात घेण्यात यावे, आदी मागण्या मोर्चाद्वारे करण्यात आल्या.

पुणे जिल्ह्यातील वाघोलीत राज्यस्तरीय निमंत्रितांची कराटे चॉनियनशिप स्पर्धा संपन्न प्रशिक्षक शरद फंड

पुणे ■ विवेकानंद फंड





पुणे : वाघोली (ता.हवेली) येथे राज्यस्तरीय निमंत्रित कराटे चॅम्पियनशिप वाघेश्वर कप २०२५ हि स्पर्धा रविवार (दि. १६) रोजी दर्जेदार नियोजनात पार पडली. स्पर्धेचे उद्घाटन शिरूर हवेलीचे आमदार ज्ञानेश्वर कटके, मा.उपसरपंच समीर भाडळे यांच्यासह विविध मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाले. या स्पर्धेत संपूर्ण महाराष्ट्र राज्यातील खेळाडूंनी सहभाग नोंदवीत विक्रम प्रस्थापित केला.

या स्पर्धेचे लाईव्ह प्रक्षेपण १८२ देशांमध्ये प्रसारित करण्यात आले. स्पर्धेसाठी नामांकित पंच, महापंच विविध भागातील खेळाडू यांची मोलाची उपस्थिती होती. तसेच स्पर्धा पार पाडण्याकरिता द चॅम्पियन्स् कराटे क्लब वाघोली व प्रशिक्षक आणि विद्यार्थ्यांनी मोठी मेहनत घेतली.

विजेत्या स्पर्धकांना माजी उपसरपंच समीर भाडळे यांच्या हस्ते मेडल व ट्रॉफी देऊन सन्मानित करण्यात आले. या स्पर्धेच्या निमित्ताने आमदार माऊली कटके, शिरूर आंबेगाव राष्ट्रवादी कॉंग्रेस अध्यक्ष मानसिंग पाचुंदकर, मा. उपसरपंच समीर भाडळे, बाळासाहेब सातव, बाभूळसर खुर्द गावचे उपसरपंच शेखर डाळिंबकर, प्रशिक्षक शरद फंड, दत्तात्रय कटके यांच्यासह इतरही मान्यवरांची उपस्थिती होती.

वाघेश्वर कप मध्ये द चॅम्पियन्स कराटे क्लब रांजणगावला प्रथम क्रमांकाची ट्रॉफी देऊन सन्मानित

पुणे ■ विवेकानंद फंड







पुणे : रविवार १६ फेब्रुवारी २०२५ रोजी सोयरीक गार्डन वाघोली या ठिकाणी पार पडलेल्या निमंत्रितांच्या राज्यस्तरीय कराटे स्पर्धेमध्ये दहा बेस्ट खेळाडूंना सायकल बक्षिस देण्यात आली. चॅम्पियन कराटे क्लब रांजणगाव सायकलची मानकरी यशी सिंह तिला एक सायकल बक्षीस स्वरूपात देण्यात आली. तर चॅम्पियन्स ऑफ चॅम्पियन्स मध्ये समृद्धी चव्हाण, गौरी क्षीरसागर, याना ट्रॉफी देऊन सन्मानित करण्यात आले व रणवीर पाचुंदकर या खेळाडूला स्पर्धेतील सर्वोत्कृष्ट खेळाडू पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. रांजणगाव गणपतीच्या २० खेळाडूंनी या स्पर्धेत सहभाग नोंदविला व १५ सुवर्ण, ४ रौप्य आणि १२ कास्य पदके मिळवून या खेळाडूंनी प्रथम क्रमांकाची ट्रॉफी मिळवली.

विजयी खेळाडू खालील प्रमाणे. नव्या नाणेकर सुवर्णपदक आराध्या नाणेकर सुवर्णपदक नंदिनी वाघमोडे कास्यपदक श्रेया रसाळ कांस्यपदक गौरी क्षीरसागर सुवर्णपदक व कांस्यपदक प्रांजल सानप सुवर्णपदक व कांस्यपदक समृद्धी चव्हाण तीन सुवर्णपदक श्रेयस नरवडे ब्रांच पदक शिवराज खेडकर रौप्य पदक कृष्णा नाणेकर रौप्य पदक विश्वजीत गायकवाड सुवर्ण व एक कास्य पदक आरुष गायकवाड दोन कास्यपदक दर्शन साठे कांस्यपदक व सुवर्णपदक शुभम ढसाळ सुवर्णपदक व कांस्यपदक यशी सिंग सुवर्णपदक व रौप्य पदक अंशुमनसिंग कांस्यपदक यशी सिंह सुवर्णपदक आदित्य साळवे कास्यपदक रणवीर पाचुंदकर सुवर्णपदक या स्पर्धेचे आयोजन चॅम्पियन्स शरद फंड यांनी केले होते. विजयी खेळाडूंना प्रशिक्षण गणपत सोनटक्के व तेजस शेळके यांनी दिले तसेच या विजयी खेळाडूंचे अभिनंदन द चॅम्पियन्स कराटे क्लब संस्थापक अध्यक्ष शरद फंड ,शिरूर आंबेगाव राष्ट्रवादी कॉंग्रेस अध्यक्ष मानसिंग पाचुंदकर पाटील, द युवा ग्रामीण पत्रकार संघ महाराष्ट्र राज्य सहसचिव विवेकानंद फंड यांनी केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

सुसंस्कृत, सुदृढ, कौशल्याधिष्ठित पिढीसाठी सामूहिक प्रयत्न आवश्यक : महेश डोके

शिरुर (पुणे) ■ शकील मनियार



शिरूर : सुसंस्कृत, सुदृढ, कौशल्याधिष्ठित पिढीसाठी सामूहिक प्रयत्न आवश्यक असल्याचे मत राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० शिक्षक क्षमता वृद्धी प्रशिक्षण २.० च्या समारोप कार्यक्रमाप्रसंगी व्यक्त केले कार्यक्रमाला शिरूर पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी बाळकृष्ण कळमकर, शिक्षण विस्तार अधिकारी किसन खोडदे, सेंट जोसेफ इंटरनॅशनल स्कूलचे अनिल पायस, नॅन्सी पायस , डेक्कन एज्युकेशनचे डॉ.समीर ओंकार उपस्थित होते. गटविकास अधिकारी डोके पुढे म्हणाले विश्वातील आव्हानांचा सामना करण्यासाठी भारतीय शिक्षण पद्धतीतून सुसंस्कारीत, सुदृढ, सर्वार्थाने कौशल्याचे विकसन करणारी ती कौशल्य आत्मसात करणारी पिढी सक्षमपणे उभी राहिली पाहिजे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या माध्यमातून हे सहज शक्य होणार आहे. याप्रसंगी तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी बाळकृष्ण कळमकर म्हणाले की राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० तालुक्यातील शेवटच्या स्तरापर्यंत पोहोचवण्यासाठी आपण प्रयत्न करूयात. भविष्यातील आव्हानं सक्षमपणे पेलण्यासाठी विद्यार्थ्यांच्या क्षमता वृद्धिंगत होण्यासाठी समाजातील अनेक घटकांना बरोबर घेऊन आपण हे शैक्षणिक धोरण प्रभावीपणे राबवूयात. शिरूर तालुकास्तरावर राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० शिक्षक क्षमता वृद्धी प्रशिक्षण २.० हे पहिल्या टप्यातील प्रशिक्षण सुलभकांच्या माध्यमातून यशस्वीपणे पार पडले. साधनव्यक्ती सुलभक संदीप क्षीरसागर, शहाजीराजे पवार, कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक संघटना लोकशाही आघाडीचे जिल्हाध्यक्ष प्रा.जितेंद्रकुमार थिटे, जिल्हा समन्वयक प्रदीप देवकाते, प्रा संतोष क्षीरसागर, अशोक कर्डिले, राजेंद्र चोरे, आदिनाथ कर्डिले, कैलास पडवळ, मनोज नाईकवाडी, संतोष खताळ, बबन गुंड, राहुल आवारी, रामचंद्र नवले, दशरथ आळवे, प्राची कुलकर्णी, प्रा.गणेश बांगर, संजना गावडे, स्नेहा खरबस, सारिका चव्हाण, प्रशांत माने, पी.ए.कुलकर्णी, चंद्रशेखर काकडे, ज्योती जाधव, बेबी तोडमल, जयश्री भुजबळ, शरयू कांबळे, सुनील भूकन, संतोष गावडे, व मान्यवर उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रकाश चव्हाण यांनी तर आभार राजेंद्र चोरे यांनी मानले

सायबर क्राईम रोखण्यासाठी इंटरनेटचा वापर सतर्कतेने करावा-डॉ अजय कुर्हे

परभणी ■ अरविंद कांबळे



परभणी : पूर्णा : श्री गुरु बुद्धीस्वामी महाविद्यालयातील समाजशास्त्र विभागाने सायबर क्राईम प्रकार आणि उपाय या विषयावर विशेष व्याख्यान आयोजित केले होते यावेळी बोलताना डॉ. अजय कुर्हे यांनी सायबर क्राईम संबंधी विद्यार्थ्यांना सखोल माहिती दिली, अनावधानाने आपल्या हातून देखील इंटरनेटचा चुकीचा वापर होऊ नये तसेच फसवीगिरी करणारे आणि तरुणांना इंटरनेटच्या माध्यमातून आमिसे दाखवण्याचे प्रकार मोठ्या संख्येने वाढलेले आहेत यातून अनेक वेळा गंभीर गुन्हे देखील घडू शकतात . समाज माध्यमांवर व्यक्त होताना देखील आपण काळजी घेतली पाहिजे, हे देखील त्यांनी आवर्जून सांगितले तसेच ऑनलाइन फ्रॉड ची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे, यातून व्यक्तीचे आर्थिक नुकसान होऊ शकते हे देखील त्यानिमित्ताने सांगितले, सायबर क्राईम म्हणजे काय, सायबर क्राईम रोखण्यासाठी उपाययोजना, सायबर क्राईमचे प्रकार या विषयावरील विद्यार्थ्यांच्या प्रश्नाला समाधानकारक उत्तर डॉ अजय कुर्हे यांनी दिली, याप्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ शिवसांब कापसे, इतिहास विभाग प्रमुख डॉ सोमनाथ गुंजकर यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्तविक समाजशास्त्र विभागातील डॉ अंबिका चोंडे यांनी केले, कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यार्थी घनश्याम कदम यांनी केले तर आभार निकिता कदम यांनी मानले यावेळी महाविद्यालयातील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

वसुंधरा परिवारच्या संस्थापिका योगिता गोसावी शिवरकर यांचा शिवजयंती निमित्ताने शिवपूजन सोहळ्यात गौरव

सातारा ■ शार्दुल मोहिते



सातारा : पुणे आम्ही पुणेकर या संस्थेचे अध्यक्ष मा हेमंत भाऊ जाधव व संस्थेचे पदाधिकारी छत्रपती शिवाजी महाराजांची किर्ती जगभर पोहचवण्यासाठी शिवस्मारक निर्मितीच्या माध्यमातून शिवचरित्राचा जगभर प्रसार करण्याचे महान कार्य करत आहेत. जपानची राजधानी टोकियो येथे छत्रपती शिवाजी महाराज यांचे स्मारक उभारण्यात येणार आहे. या भव्य स्मारकाचे पूजन व आरती सोहळा गणेश कला क्रिडा मंच येथे आयोजित करण्यात आला होता. या ऐतिहासिक सोहळ्यात

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या पुण्यनगरीत शिवप्रेमी व्यक्तींचा गौरव करण्यात आला. वसुंधरा परिवार ग्रुपच्या संस्थापिका योगिता गोसावी यांचा उपस्थित मान्यवरांच्या हस्ते शाल व छत्रपती शिवाजी महाराज यांची प्रतिमा देऊन गौरव करण्यात आला. आम्ही पुणेकर संस्थेचे अध्यक्ष हेमंत भाऊ आपले शतशः आभार व आपल्या या अनमोल कार्यास लक्ष लक्ष शुभेच्छा.

माता जिजाऊ, छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराज हे माझे प्रेरणा स्थान आहेत माझे दैवत आहे आणि शिवजयंतीच्या आधी छत्रपती शिवाजी महाराज यांची प्रतिमा मिळणे माझ्यासाठी खूप भाग्याची गोष्ट आहे. खूप पुण्य केले असेल म्हणून हा सन्मान आज अनेक मान्यवरांच्या हस्ते मिळाला असे मनोगत योगिता गोसावी यांनी व्यक्त केले. या सोहळ्यात मा डॉ श्री कराड, मा श्री प्रदीप रावत, मा श्री पांडुरंग बलकवडे, अध्यक्ष मा श्री हेमंत जाधव व अनेक मान्यवर उपस्थित होते. इव्हेंट व्यवस्थापक विशाल भाऊ कंठाळे आपले मनापासून धन्यवाद.

या ऐतिहासिक सोहळ्यात वसुंधरा परिवारच्या सविता हिंगणे, वर्षा तांबोळी, अश्विनी निकम, वंदना जैन, शुभांगी पाटील, उमा धनकवडे, उषा वाणी, लक्ष्मी वेताळ, मिनल जोशी, राधिका शिंदे, राधिका मेड, रेखा खिरीड, इशा शिके, शलाका बेहरे, नमिता दगडे, दीपाली राऊत, सुजाता पिठले, संजना, सुधा गायकवाड, मनिषा शिंदे, अंजना शिंदे, पार्वती भिसारे, पंचशीला कदम व कल्पना भोसले ई महिला उपस्थित होत्या.

नवोदय विद्यालय येथे दोन दिवसीय कार्यशाळा उत्साहात संपन्न - वनस्पती वर्गीकरण, पर्यावरण आणि पर्यावरणीय शास्त्रावर विद्यार्थ्यांचा भरघोस प्रतिसाद

नांदेड ■ प्रतिनिधी



नांदेड : पीएम श्री जवाहर नवोदय विद्यालय, शंकर नगर, नांदेड येथे १७ व १८ फेब्रुवारी २०२५ रोजी 'वनस्पती वर्गीकरण, पर्यावरण आणि पर्यावरणीय शास्त्र' या विषयावर दोन दिवसीय कार्यशाळा अत्यंत उत्साहात संपन्न झाली. ऍ भारत फाऊंडेशन आणि शरदचंद्र कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयाच्या वनस्पतीशास्त्र विभागाच्या संयुक्त विद्यमाने तसेच जवाहर नवोदय विद्यालय, शंकर नगर, नांदेड यांच्या सहकार्याने ही कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती.

विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन वाढवणे आणि पर्यावरण संवर्धनाबाबत जागरूकता निर्माण करणे हा या कार्यशाळेचा प्रमुख उद्देश होता. ८वी, ९वी आणि ११वीच्या विद्यार्थ्यांसाठी विशेषरित्या आयोजित या उपक्रमामध्ये पुष्पबंधांचे विविध प्रकार प्रत्यक्ष दाखवण्यात आले. विद्यार्थ्यांना परिसरात थेट निरीक्षण करून पर्यावरणविज्ञान व वनस्पतीशास्त्र याबद्दल सखोल ज्ञान मिळावे, यासाठी शालेय आवारात क्षेत्रभ्रमणही करण्यात आले.

या कार्यशाळेत प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ. सचिन के. तिप्पट (प्राध्यापक व विभाग प्रमुख, पर्यावरणशास्त्र विभाग, श्रीमती नरसम्मा कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, किरण नगर, अमरावती), डॉ. एस. एस. पाटील आणि श्री. दर्शन तळहांडे (वनस्पतीशास्त्र विभाग, शरदचंद्र कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय) यांनी विद्यार्थ्यांना मौलिक मार्गदर्शन केले. त्यांच्या सखोल ज्ञानामुळे विद्यार्थ्यांना वनस्पती वर्गीकरण आणि पर्यावरणविषयक संकल्पना अधिक स्पष्टपणे समजल्या.

भारत फाऊंडेशनने विद्यार्थ्यांसाठी विशेष शैक्षणिक साहित्य आणि कीटचे वितरण केले. त्यांच्या वतीने अशा नाविन्यपूर्ण उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक जिज्ञासा आणि पर्यावरणीय भान वाढवण्याचा सतत प्रयत्न केला जात आहे. या उपक्रमास शरदचंद्रकला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयाच्या वनस्पतीशास्त्र विभागाचा मोठा पाठिंबा मिळाला, ज्यामध्ये प्राचार्य डॉ. के. हरिबाबू आणि उपप्राचार्य व वनस्पतीशास्त्र विभाग प्रमुख डॉ. एस. एस. पाटील यांचे महत्त्वाचे योगदान लाभले.

कार्यशाळेच्या यशस्वी आयोजनामागे जवाहर नवोदय विद्यालय, शंकर नगर, नांदेडचे प्राचार्य श्री. एस. जी. मांडले यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच, श्री. एन. एन. घमे (इउऊ जीवशास्त्र) आणि श्री. मोहित (इउऊ गणित) यांचेही सहकार्य लाभले. श्री. एन. एन. घमे सर अशा नाविन्यपूर्ण उपक्रमांच्या आयोजनासाठी सतत आग्रही असतात आणि ते स्वतः जीवशास्त्राचे शिक्षक असल्याने हा कार्यक्रम विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचावा आणि त्यातून त्यांची पर्यावरण आणि आपल्या आसपासच्या वनस्पतींबद्दल जागरूकता निर्माण व्हावी यासाठी त्यांनी या कार्यक्रमाची संकल्पना राबवली.

भारत फाऊंडेशनचे सचिव श्री. शुभम धर्माळे तसेच प्राचार्य के. हरीबाबू म्हणाले, 'विद्यार्थ्यांमध्ये एऊश्रं (विज्ञान, तंत्रज्ञान, अभियांत्रिकी आणि गणित) विषयांबद्दलची आवड निर्माण करण्यासाठी आम्ही भविष्यात अधिकाधिक अशा उपक्रमांचे आयोजन करत राहू.'

ही कार्यशाळा अत्यंत प्रेरणादायी ठरली, विद्यार्थ्यांनी यात सक्रिय सहभाग घेतला आणि वैज्ञानिक शिक्षण व पर्यावरण संवर्धनाच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल टाकले. कार्यशाळेच्या समारोप कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी त्यांच्या अनुभवांचे सादरीकरण केले आणि त्यांनी मिळवलेल्या ज्ञानाचा उपयोग भविष्यात कसा करता येईल, यावर चर्चा करण्यात आली. सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे वितरित करण्यात आली, ज्यामुळे त्यांना प्रोत्साहन मिळाले.

यासारख्या कार्यशाळांमुळे विद्यार्थ्यांना वर्गाबाहेर प्रत्यक्ष अनुभव मिळतो आणि त्यांची पर्यावरण संवर्धनाची जाणीव वाढते. आयोजकांनी भविष्यातही अशा उपक्रमांचे आयोजन करण्याचा संकल्प केला, जेणेकरून अधिकाधिक विद्यार्थी वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करू शकतील आणि पर्यावरण रक्षणासाठी योगदान देऊ शकतील.

शिवजन्मोत्सवानिमित्त कंधार येथे रक्तदान शिबिराचे आयोजन

कंधार ■ संतोष कांबळे

कंधार : हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जन्मोत्सवानिमित्त कंधार येथे कॉलेज ऑफ फार्मसी व भारतीय जनता पार्टी कंधार च्या वतीने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

आजच्या तंत्रज्ञानाने सज्ज असणाऱ्या युगातही रक्त हे मानवी शरीर सोडून प्रयोगशाळेत तयार होत नाही. रुग्णसेवेमध्ये औषधोपचारा सोबत रुग्णांना रक्तपुरवठ्याची गरज भागवण्यासाठी रक्तदान हा एकमेव पर्याय आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत निजामशाही, आदिलशाही, कुतुबशाही उलथविण्याचे महान कार्य केले. त्यांच्या कार्याची तुलना कदापि होणे शक्य नाही. त्याच अनुषंगाने 'रक्तदान' ही एक समाजाची गरज आहे. विज्ञान कितीही पुढे गेले असले तरीही अद्याप रक्ताला पर्याय उपलब्ध करू शकले नाही. त्यामुळेच छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीच्या निमित्ताने कंधार येथे भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

१९ फेब्रुवारी रोजी शिवजन्मोत्सवाच्या अनुषंगाने विविध सामाजिक उपक्रम साजरा करण्याचा निर्धार शिवप्रेमींनी केला आहे त्याच अनुषंगाने कंधार येथील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे कॉलेज ऑफ फार्मसी व भारतीय जनता पार्टी कंधारच्या वतीने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे या रक्तदान शिबिरात जास्तीत जास्त संख्येने शिवभक्तांनी सहभागी व्हावे व रक्तदान करावे असे आव्हान जिल्हा परिषदेचे माजी सदस्य ?ड विजय धोंडगे व पंचायत समितीचे सदस्य डॉ सुनील धोंडगे यांच्या वतीने करण्यात आले आहे.

पर्यावरण मंत्री ना.पंकजाताई मुंडे बिंदुसरा नदीचे पुनरज्जीवन करावे ; बिंदुसरा नदी प्रदुषण व अतिक्रमण मुक्त करा मागणीसाठी बिंदुसरा नदीपात्रात लक्ष्यवेधी आंदोलन

बीड ■ प्रतिनिधी



बीडः बीड शहरातील बिंदुसरा नदीचे पुनर्जीवन करावे . बिंदुसरा नदीपात्रातील अतिक्रमित बांधकाम तसेच नगरपरिषद कर्मचाऱ्यांमार्फत कचरा टाकणे तसेच जैविक कचरा यामुळे नदीचे प्रदुषण होत असुन बीडकरांच्या आरोग्यास धोका निर्माण झाला आहे. बिंदुसरा नदीच्या प्रदूषणास जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी आणि बिंदुसरा नदीचे पुनर्जीवन करावे या प्रमुख मागणीसाठी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ.गणेश ढवळे लिब़ागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली आज दि.१७ सोमवार रोजी सकाळी बिंदुसरा नदीवरील दगडी पुल नदीपात्रात लक्ष्यवेधी आंदोलन करण्यात येऊन जिल्हाधिकारी बीड, मुख्याधिकारी नगरपरीषद बीड यांच्या मार्फत पर्यावरण मंत्री, वातावरणीय बदल मंत्री पंकजाताई मुंडे, उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजितजी पवार, उपमुख्यमंत्री तथा नगरविकास मंत्री एकनाथजी शिंदे यांना निवेदन देण्यात आले. यावेळी आंदोलनात माजी सैनिक अशोक येडे जिल्हाध्यक्ष आम आदमी पार्टी रामनाथ खोड, शेख युनुस, जिल्हाध्यक्ष इंटक रामधन जमाले, सुदाम तांदळे, पांडुरंग हराळे, शेख मुबीन आदी सहभागी होते.

सविस्तर माहितीस्तव

बीड शहरातील बिंदुसरा नदीपात्रात मोठ्या प्रमाणावर सांडपाणी कचरा व जैविक कचरा टाकण्यात आला आहे त्यामुळे मोठ्या प्रमाणावर नदीचे प्रदुषण झाले आहे. त्यामुळे

बीड शहरातील बिंदुसरा नदी प्रकल्पाचा आढावा घेऊन बिंदुसरा नदीपात्रातील भुमाफियांकडुन होणारे अतिक्रमित बांधकाम, बिंदुसरा नदीपात्रात मनपा कर्मचाऱ्यांमार्फत टाकला जाणारा कचरा तसेच जैविक कचरा यामुळे बीडकरांचे आरोग्य धोक्यात असुन भविष्यात १९८९ सारखी पुरस्थिती निर्माण झाल्यास मोठ्या प्रमाणावर वित्तहानी आणि जिवितहानी होऊ शकते यासाठी नगरपरिषदेने सीमारेषा आखुन फ्लड झोन, ग्रीन झोन, रेड झोन, यल्लो झोन आदी बाबत उपाययोजना करण्यात यावी. पूररेषेच्या आत असणारी अतिक्रमित बांधकाम प्रकरणी हलगर्जीपणा करणाऱ्या नगरपरिषद प्रशासनातील अधिकाऱ्यांवर प्रशासकीय कारवाई करण्यात यावी. अशी मागणी करण्यात आली आहे.

हडपसर विभागातील शिक्षक क्षमता वृद्धी प्रशिक्षण पहिला टप्पा उत्साहात संपन्न



पुणे ■ इसरार शेख

महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था पुणे व समग्र शिक्षा शिक्षण विभाग पुणे महानगरपालिका यांच्या वतीने जयवंत शिक्षण प्रसारक मंडळ हांडेवाडी हडपसर येथे प्राथमिक माध्यमिक व उच्च माध्यमिक स्तरातील शिक्षक क्षमता वृद्धी प्रशिक्षणाचा प्रथम टप्पा संपन्न झाला.

या पाच दिवशीय प्रशिक्षण शिबिरात हडपसर विभागाच्या पर्यवेक्षिका श्रीमती लीला मोरे, समग्र शिक्षा विभागाच्या प्रमुख श्रीमती प्रतिभा जाधव, रेहाना पटेल, स्मिता हडवळे, उमर शहा ,रूपाली कळसाईत यांनी उपस्थित शिक्षकांना मार्गदर्शन केले.

या प्रशिक्षणामध्ये विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर भर देण्यात आला. यामध्ये विद्यार्थी हा मूल्यांकन आराखड्याच्या केंद्रस्थानी आहे. तसेच मूल्यांकन आराखडा, मूल्यांकन प्रणाली ,अहवाल मूल्यांकन कार्यप्रणाली मार्गदर्शक तत्वे ,स्वयं मूल्यमापन मूल्यांकन ,अभिप्राय एकत्रीकरण विविध स्तर प्रारंभिक प्रगतिशील प्रगत उपक्षेत्र मानके क्षेत्रनिहाय गुणांकन पायाभूत सुविधा, शालेय नेतृत्व ,लिंग समभाव व व्यवस्थापन अशा विविध घटकांविषयी माहिती देण्यात आली. यावेळी उपस्थित सर्व तज्ञमार्गदर्शक शिक्षकांनी प्रात्यक्षिकद्वारे सूर ,ताल ,लय गीते व कविता हसत खेळत शिकवावे याविषयी मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्रीमती प्रतिभा जाधव यांनी केले. तर कार्यक्रमाची सूत्रसंचालन श्री. संतोष प्रभू आसवले यांनी केले व आभार श्री. सुहास जाधव यांनी मानले.

काँग्रेसच्या नवनियुक्त प्रदेशाध्यक्षांचा महेंद्रशेठ घरत यांच्या हस्ते सन्मान



दै, जनप्रभात उरण ता.प्रतिनिधी
विठ्ठल ममताबादे

उरण : कामगार नेते तथा काँग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्रशेठ घरत यांनी काँग्रेसचे नवनिर्वाचित प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांचे स्वागत आणि सन्मान केला.

महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे नवनियुक्त प्रदेशाध्यक्ष म्हणून हर्षवर्धन सपकाळ यांची निवड झाली. त्यानिमित्त त्यांचा पदग्रहण सोहळा आज मुंबई येथे मातोश्री बिर्ला सभागृहात झाला. त्यावेळी जिल्हाध्यक्ष महेंद्रशेठ घरत आवर्जून उपस्थित होते.

काँग्रेसच्या नवनियुक्त प्रदेशाध्यक्षांचा सन्मान महेंद्रशेठ घरत यांनी केल्यामुळे कार्यकर्त्यांच्या आनंदाला उधाण आले होते. यावेळी माजी मुख्यमंत्री सुशीलकुमार शिंदे, नाना पटोले, विजय वडेट्टीवार, खासदार प्रणिती शिंदे, चंद्रकांत हंडोरे, वसंत पुरके, भाई जगताप आदी मान्यवर उपस्थित होते.

काँग्रेसचा तळागाळातील कार्यकर्ता प्रदेशाध्यक्ष झाल्याने निश्चितच काँग्रेसला पुन्हा सुगीचे दिवस येतील. काँग्रेस हा सर्वांना सामावून घेणारा पक्ष आहे. येणारा काळ हा काँग्रेसचाच असेल.

-महेंद्रशेठ घरत, जिल्हाध्यक्ष काँग्रेस.

शिवभक्तांचे आराध्य दैवत असलेल्या सोमेश्वर देवस्थानचे येत्या २१ तारखेला कलशारोहण



पुणे ■ विवेकानंद फंड



पुणे : शिरूर तालुक्यातील पाच पांडवकालीन स्थापित पिंपरी दुमाला येथील सोमेश्वर देवस्थानचे कलशरोहन सोहळा आयोजित केला आहे. या सोहळ्यानिमित्त शुक्रवार दिनांक २१ फेब्रुवारी रोजी विविध कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. या सर्व कार्यक्रमास गावातील सर्व माहेरवासीन कुटुंबीय मित्रपरिवार व सर्व भाविकांनी उपस्थित राहून कार्यक्रमाचे शोभा वाढवावी व सोमेश्वर महाराजांचे दर्शन व महाप्रसादाचा लाभ घ्यावा असे आवाहन सोमेश्वर देवस्थान ट्रस्ट व पिंपरी दुमाला ग्रामस्थ यांनी केले आहे. या कलशारोहण सोहळ्यासाठी कलश सौजन्य श्री. बबनराव तुकाराम कुटे (मा. अध्यक्ष महागणपती देवस्थान ट्रस्ट) व श्री. प्रकाशशेठ मोतीलाल लांडे (मा. चेअरमन रांजणगाव गणपती) तसेच पिंपरी दुमालातील माहेरवासनी यांचे सहकार्य लाभले आहे.

कलशारोहण सोहळ्यानिमित्त दिनांक २१ रोजी पहाटे ४.३० वाजता पुजा, मातृका पूजन, होम, हवन, इत्यादी ९.३० वाजेपर्यंत विधी संपन्न होणार आहे.

त्यानंतर सकाळी १० वाजता तमाम शिवभक्त व सर्व ग्रामस्थ पाहुणेमंडळी यांच्या उपस्थितीमध्ये भव्य कलश मिरवणूक सोहळा संपन्न होणार आहे व यानंतर प्राणप्रतिष्ठा सोहळा संपन्न होणार आहे हा सोहळा दुपारी १२ वाजेपर्यंत संपन्न होणार आहे. दुपारी बारानंतर सर्व शिवभक्तांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. या कालावधीमध्ये मान्यवर देणगीदार यांचा सन्मान सोहळा संपन्न होणार आहे श्री क्षेत्र सोमेश्वर देवस्थान मंदिरासाठी फुलांचे आकर्षक सजावट ह.भ.प. नानासाहेब दिनकरराव पाचुंदकर यांचे सौजन्य लाभणार आहे या कलशारोहन सोहळा साठी ह.भ. प. नंदकिशोर दादा महाराज आळंदी हे उपस्थित राहणार असून महाराजांच्या हस्ते कलशारोहण बसवण्यात येणार आहे प्रसिद्ध कीर्तनकार ह.भ.प. संतोष महाराज कौठाळे यांची कीर्तन सेवा लाभणार आहे.

छत्रपती शिवाजी महाराज आणि पर्यावरण संरक्षण आजच्या काळातील गरज शिवजयंतीच्या निमित्ताने



पर्यावरण हा मानवी जीवनाचा मूलभूत घटक आहे. परंतु आजच्या काळात औद्योगिकीकरण, जंगलतोड, प्रदूषण आणि वाढत्या शहरीकरणामुळे निसर्गाचा समतोल बिघडत आहे. ही समस्या सोडवण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराज यांचे पर्यावरणपूरक प्रशासन आणि निसर्गसंवर्धनाच्या धोरणांमधून प्रेरणा घेणे आवश्यक आहे.

छत्रपती शिवाजी महाराज आणि पर्यावरण संरक्षणाचे धोरण

छत्रपती शिवाजी महाराज हे एक दूरदृष्टी असलेले राज्यकर्ते होते. त्यांनी राज्य स्थापनेसाठी आणि संरक्षणासाठी निसर्गाचा योग्य वापर केला पण त्याचा नाश केला नाही. त्यांच्या धोरणांमधून पर्यावरण संरक्षणाचा महत्त्वाचा दृष्टिकोन स्पष्ट दिसतो.

१. गड-किल्ल्यांचे बांधकाम आणि निसर्गसंवर्धन

किल्ले बांधताना निसर्गाचे संतुलन बिघडणार नाही याची काळजी घेतली.

किल्ल्यांवरील पाण्याचे नैसर्गिक स्त्रोत (तलाव, टाक्या) जपून ठेवले.

जंगलाचा आधार घेत शत्रूंच्या आक्रमणांपासून संरक्षणाची युक्ती अवलंबली.

उदाहरणः रायगड किल्ल्यावर मोठ्या प्रमाणावर जलसाठे आणि तलाव होते, जे गडावर राहणाऱ्या लोकांना पुरेसा पाण्याचा पुरवठा करत होते.

प्रतापगड आणि राजगडावर नैसर्गिक खडकांचा उपयोग करून बांधकाम केले, त्यामुळे अनावश्यक वृक्षतोड टाळली गेली.

२. जंगलसंवर्धन आणि जैवविविधतेचे रक्षण

महाराजांनी जंगलतोडीवर कडक निर्बंध घातले.

सैन्यासाठी आवश्यक असलेले लाकूड केवळ ठरावीक प्रमाणातच वापरण्याचे आदेश दिले.

जंगलतोड झाल्यास त्याजागी नव्याने झाडे लावण्याचा प्रघात सुरू केला.

उदाहरणः

पन्हाळगड आणि तोरणा किल्ल्यांच्या परिसरातील जंगलांना संरक्षण देण्यात आले होते, कारण हीच घनदाट जंगले त्यांची लढाईतील ताकद होती.

महाराजांच्या सैन्याने गनिमी कावा करताना जंगलांचा वापर संरक्षणासाठी केला, परंतु त्याचा नाश केला नाही

३. पाणी व्यवस्थापन आणि नैसर्गिक स्रोतांचे संरक्षण

गावोगावी तलाव, विहिरी आणि बंधारे बांधण्यावर भर दिला.

गड-किल्ल्यांवर पावसाचे पाणी साठवण्याच्या उत्तम योजना राबवल्या.

नद्यांचे शुद्धता आणि प्रवाह कायम राहावा म्हणून निर्जलनीती अवलंबली.

उदाहरणः

शिवनेरी किल्ल्यावर मोठ्या पाण्याच्या टाक्या बांधून जलसाठा केला गेला होता, जो संपूर्ण वर्षभर पुरेसा असे.

महाराजांच्या काळात नद्यांच्या खोऱ्यातील जंगलांची तोड रोखून पाण्याची पातळी कायम ठेवली गेली.

४. शेती आणि पर्यावरणपूरक कृषी धोरण

जमिनीचा कस टिकवण्यासाठी नैसर्गिक खतांचा वापर करण्यास प्रवृत्त केले.

पाणीटंचाई टाळण्यासाठी गावागावांत जलव्यवस्थापनाची कडक अंमलबजावणी केली.

कृषी सुधारणा धोरण राबवून निसर्गपूरक शेतीला चालना दिली.

उदाहरणः महाराजांनी शेतकऱ्यांना नदी, तलाव आणि विहिरींच्या संवर्धनासाठी प्रोत्साहन दिले.

अनावश्यक जंगलतोड टाळून जमिनीचा सुपीकपणा जतन करण्यावर भर दिला.

पर्यावरणाचा ऱ्हास करणाऱ्यांना कठोर शासन आणि भरपाई धोरण

आज वाढत्या औद्योगिकीकरणामुळे आणि शहरीकरणामुळे पर्यावरणाचा ऱ्हास वेगाने होत आहे. नद्या प्रदूषित होत आहेत, जंगलांची तोड वाढली आहे आणि वायुप्रदूषणामुळे आरोग्य समस्या निर्माण होत आहेत. अशा परिस्थितीत, पर्यावरण रक्षणासाठी कठोर कायदे आणि दंडात्मक कारवाई करणे अत्यावश्यक आहे.

१. कठोर कायदे आणि त्यांची अंमलबजावणी

जंगलतोड, नदी प्रदूषण, अनधिकृत खाणकाम यावर कडक निर्बंध लावणे.

कंपन्यांनी आणि कारखान्यांनी केलेल्या प्रदूषणासाठी मोठ्या प्रमाणावर दंड आकारला जावा.

प्लास्टिक आणि औद्योगिक कचऱ्याच्या विल्हेवाटीसाठी कठोर नियम लागू करावेत.

उदाहरणः

ब्राझील सरकारने अमेझॉनच्या जंगलतोडीसाठी जबाबदार असणाऱ्या कंपन्यांवर मोठ्या प्रमाणावर दंड लावला आहे.

भारतात राष्ट्रीय हरित लवाद (ऊऊ) ने अनेक कंपन्यांवर पर्यावरण नाश केल्याबद्दल दंड ठोठावला आहे.

२. पर्यावरणाची हानी करणाऱ्यांना आर्थिक भरपाई आणि जबाबदारी

औद्योगिक कंपन्यांनी त्यांच्या प्रदूषणामुळे झालेल्या नुकसानाची भरपाई द्यावी.

पर्यावरण सुधारण्यासाठी त्या कंपन्यांना वृक्षलागवड आणि जलस्रोत पुनर्बांधणीसाठी जबाबदार धरावे.

उदाहरणः

अमेरिकेत, ँइ ऑइल कंपनीने समुद्रात झालेल्या तेलगळतीची मोठी भरपाई दिली होती.

महाराष्ट्रात, काही खाणींना पर्यावरण पुनर्बांधणीसाठी मोठा निधी द्यावा लागला आहे.

आज पर्यावरण रक्षण काळाची गरज

१. वृक्षलागवड आणि हरित क्षेत्र वाढवणे

प्रत्येक नागरिकाने दरवर्षी किमान ५ झाडे लावणे बंधनकारक करावे.

शहरीकरणामुळे नष्ट झालेल्या जंगलांचे पुनर्निर्माण करणे आवश्यक आहे.

२. जलसंधारण आणि पाण्याचा सुयोग्य वापर

नद्यांचे प्रदूषण रोखण्यासाठी कठोर नियम लागू करणे.

जलस्रोत जतन करण्यासाठी आधुनिक पद्धतींचा अवलंब करणे.

३. प्रदूषण नियंत्रण आणि स्वच्छ उर्जेचा वापर

सौर आणि वाऱ्याच्या ऊर्जेला चालना देऊन कोळसा आणि डिझेलवरील अवलंबित्व कमी करणे.

मोठ्या शहरांमध्ये वायुप्रदूषण रोखण्यासाठी इलेक्ट्रिक वाहनांना प्रोत्साहन देणे

छत्रपती शिवाजी महाराजांचे पर्यावरणपूरक धोरण आजच्या काळातही दिशादर्शक आहे. त्यांनी जलसंधारण, जंगलसंवर्धन आणि पर्यावरणपूरक विकासावर भर दिला. आज आपणही त्यांच्या विचारांवर चालून पर्यावरण वाचवण्यास पुढाकार घेतला पाहिजे. कठोर कायदे, जबाबदार नागरिकता आणि नैसर्गिक साधनसंपत्तीचे संरक्षण हेच शाश्वत भविष्याची गुरुकिल्ली आहे.

'शिवाजी महाराजांचे विचार अमलात आणूनच पर्यावरण रक्षण आणि शाश्वत विकास शक्य आहे!'

नाहीतर पर्यावरण चे परिणाम आपण भोगत आहोत त्यांचे अधिक दुष्परिणाम आपल्याला भोगावे लागेल .

मग कसला विचार करताय झाडे लावूया त्याचे संवर्धन करूया व पर्यावरणाला वाचूया याच अर्थाने छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती साजरी करूया.

नाना शंकर पाटील सर
कार्याध्यक्ष पर्यावरण जागर प्रतिष्ठान
ब्रँड अँबेसेडर भुसावळ नगरपरिषद भुसावळ

एक हात मदतीचा आव्हानातून कुटुंबाला मदतीचा हातभार

पुणे ■ प्रतिनिधी



पुणे :शिरूर तालुक्यातील सविंदणे गावातील कामठेवाडी येथील कै. महेश जयसिंग तावरे यांचे दोन महिन्यापूर्वी ब्रेन ट्यूमर या आजारामुळे निधन झाले. तावरे कुटुंब हे पोल्ट्री शेड वर काम करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करत होते. कुटुंबातील मुलगी रूपालीचा विवाह ठरलेला. कुटुंबाची जबाबदारी कु. पवन महेश तावरे यांच्यावर होती कुटुंबातील महेश तावरे यांचे निधन झाल्यामुळे दुर्गेश कंपनीचे मॅनेजर सचिन कामथे यांनी मदतीची आव्हान करत कुटुंबाला आधार देण्याचा प्रयत्न केला. जीवन जगत असताना अनेक वेळा संकटाचा सामना करावा लागतो. या कुटुंबाला आधार देण्यासाठी दुर्वेश कंपनीचे मॅनेजर सचिन कामथे यांनी व्हाट्सअप ग्रुप, व स्टेटसच्या माध्यमातून आव्हान करत या कुटुंबाला १००००० (एक लाख रुपये) जमा करून दिले. विविध क्षेत्रातील मान्यवरांनी मदत करत कुटुंबाला आधार दिला. मागील रविवारी या कुटुंबातील रूपालीचा विवाह संपन्न झाला. ही मदत पवन महेश तावरे यांच्याकडे सुपूर्त करण्यात आली. जीवनात माणुसकी धर्म सर्वात मोठा धर्म मानला जातो. संकटकाळात कुटुंबाला झालेल्या मदतीमुळे दुर्वेश कंपनीचे मॅनेजर सचिन कामथे यांचे परिसरातून कौतुक होत आहे.

समाजामध्ये अनेक वेगवेगळ्या घटना घडत असतात, अनाठाई खर्च टाळून अशा प्रसंगातील कुटुंबाला मदत करण्याचा प्रयत्न समाजाने करावा अशी भावना समाजसेवक शहाजी दळवी यांनी व्यक्त केली.

बीडमध्ये चार महिन्यांपासून कंत्राटी कर्मचारी नियुक्तीच्या प्रतीक्षेत, न्यायासाठी मा.पालकमंत्री मा.अजितदादा पवार यांना साकडे

केज ■ प्रतिनिधी



केज : महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना अंतर्गत कामकाजासाठी विविध पदांची भरती केली जाते. यात ,ऐ.पी.ओ. पी.टि.ओ. व सी.डी.ई.ओ. यांचा प्रामुख्याने समावेश आहे. ग्रामीण भागात रोजगार मिळवून देन्यासाठी या योजनेचा महत्वाचा वाटा आहे. पाणी प्रश्नावर काम करत असताना उन्हाळ्यातील बरीचशी कामे पुर्ण करण्यात ही योजना यशस्वी ठरली आहे. सध्या बीड जिल्ह्यात शेतकऱ्यांमार्फत सिंचन विहीर, विहीर पुनःभरण, जलतारा, शेततळे ईत्यादी कामांची मागणी होत आहे. सध्या ही कामे पूर्णत्वाकडे नेण्यासाठी कार्यरत असलेले कर्मचारी मनुष्यबळ यासाठी अपुरे पडताना दिसत आहे. २७/०९/२०२४ रोजीच्या शासन निर्णयानुसार अनुद्येय पदांच्या संख्येनुसार बीड जिल्ह्यात एकूण २३९ पदांची आवश्यकता असताना आजरोजी फक्त १७६ पदेच भरली आहेत. बीड जिल्ह्यामध्ये ६३ जागा अजूनही रिक्त असून त्यापैकी फक्त ४७ जागांसाठी दि. १३/१०/२०२४ पर्यंत कंत्राटी मनुष्यबळ उपलब्ध करून देण्यात आले होते. सदरील उपलब्ध करून देण्यात आलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांना अजूनही नियुक्त्या दिलेल्या नाहीयेत. यामुळे सध्या कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांवर अतिरिक्त कामांचा ताण वाढत चालला आहे. परिणामी कर्मचारी अभावी बीड जिल्ह्याची म.ग्रा.रो.ह.यो योजनेत वेळेत काम करण्याची गुणवत्ता महाराष्ट्रात सर्वात खाली गेली आहे. पुरेसे कर्मचारी उपलब्ध नसल्याने सदरील म.ग्रा.रो.ह.यो योजनेत शेतकऱ्यांची कामे पुर्ण करण्यासाठी शेतकऱ्यांना दिवसेंदिवस ताटकळत रहावे लागत आहे, यामुळे लाभार्थ्यांनाही वेळेत मजुरी उपलब्ध होण्यास सध्या विलंब होत आहे. कर्मचारी अभावी शेतकऱ्यांना व मजुरांना अशा होणाऱ्या नाहक त्रासाला नाईलाजाने सामोरे जावे लागत आहे.

सर्व कंत्राटी कर्मचाऱ्यांनी नियुक्त्याबाबत विचारणा केली असता बीड जिल्ह्याचे प्रशासन सकारात्मक असूनही चार महिन्यांपासून कंत्राटी कर्मचारी यांना मिळणारे तुटपुंजे मासिक वेतनही नियुक्ती अभावी मिळत नाहीये करिता परिवाराचा आर्थिक बोजा कंत्राटी कर्मचाऱ्यांवर वाढतच चालला आहे.

करिता उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री मा.अजितदादा पवार यांनी चार महिन्यांपासून रखडलेल्या नियुक्त्याकडे लक्ष घालून कंत्राटी कर्मचाऱ्यांना न्याय मिळवून द्यावा अशी भावना सर्वत्र कंत्राटी कर्मचाऱ्यात व्यक्त होत आहे.

कारंजात स्मार्ट प्रीपेड मीटर विरोधात संताप; विविध सामाजिक संघटनांनी काळया फिती लावून केला निषेध ;स्मार्ट प्रीपेड मीटर विरोधात कारंजात विविध सामाजिक संघटनांचा एल्गार

कारंजा (घा.) ■ सिध्दार्थ सोमकुवर



कारंजा (घा.) : स्थानिक विविध सामाजिक संघटना व वीज ग्राहकांकडून कारंजा येथील विद्युत वितरण कंपनीला निवेदन देऊन स्मार्ट प्रीपेड मीटर बसविण्याच्या विरोधात काळया फिती लाऊन शासनाच्या धोरणाचा निषेध केला आहे.

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीपूर्वी मुख्यमंत्र्यांनी महावितरण कंपनी कडून स्मार्ट प्रीपेड मीटर्स लावले जाणार नाही असे जाहीर केले होते. परंतु विधानसभा निवडणूक संपताच स्मार्ट प्रीपेड मीटर बसविणे सुरू झाले आहे.

वीज वितरण कंपनीच्या कारंजा कार्यक्षेत्रामध्ये सुद्धा वीज ग्राहकांकडे स्मार्ट प्रीपेड मीटर बसविण्याची कार्यवाही सुरू झाली आहे. त्या कार्यवाहीचा विविध सामाजिक संघटनांनी निवेदनाद्वारे निषेध व्यक्त केला आहे.

स्मार्ट प्रीपेड मीटर्स कंपनीच्या खर्चाने मोफत लावणार अशी फसवी व चुकीची जाहिरात केली जात आहे. या संबंधातील टेंडर्स मंजूर करण्यात आलेली आहेत वास्तविक हे मीटर्स मोफत लावले जाणार नाहीत. त्याचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष भुर्दंड हा वीज ग्राहकालाच भरावा लागणार ! हे मात्र सत्य आहे.

वीज ग्राहकांची कोणत्याही प्रकारची मागणी नसताना स्मार्ट प्रीपेड मीटर का बसविल्या जात आहे ? हा प्रश्न वीज ग्राहकांमध्ये निर्माण झाला आहे. वीज वितरण कंपनीने ग्राहक कल्याण किंवा लोककल्याणकारी भूमिका विचारात न घेता भविष्यात वीज वितरण कंपनीद्वारे ग्राहकांच्या खिशातूनच ही रक्कम वसूल केल्या जाईल हे निश्चित व स्पष्ट आहे.

वीज ग्राहकांचे हित लक्षात न घेता खाजगी वितरण कंपन्या वा सरकार यांच्या हितासाठी आणि खाजगीकरणाच्या वाटचालीतील पुढचा टप्पा म्हणूनच ही योजना आणलेली आहे असे स्पष्ट दिसून येत असल्याचे सामाजिक संघटनांनी व वीज ग्राहकांनी म्हटले आहे. मीटर निवडण्याचे स्वातंत्र्य वीज ग्राहकांना असावे. आज जरी मीटरची किँमत ग्राहकाकडून वसूल केल्या जात नसली तरी

भविष्यात मीटर ची किंमत वीज दरामध्ये वाढ करूनच याची आर्थिक तरतूद वीज ग्राहकांच्या बिलातूनच करणार. आम्हाला स्मार्ट प्रीपेड मीटर अमान्य असून

ग्राहकांच्या

परवानगीशिवाय सदर मीटर लावू नयेत असे म्हटले आहे.

सर्वसामान्य ग्राहकांसाठी स्मार्ट मीटर परवडणे शक्य नाही. स्मार्ट मीटरबाबत सतर्क राहून नागरिकांनी विरोध करण्याचे आवाहन सामाजिक संघटनांनी केले आहे.

सध्याच्या व्यवस्थेनुसार वीजबिल भरण्यासाठी आठ ते दहा दिवस मुदत मिळते, ती व्यवस्था प्रीपेड मीटरमध्ये मिळणार नाही. रिचार्ज संपल्यास आपोआप वीजपुरवठा खंडित होईल. रिचार्ज करण्यासाठी पैसे नसणाऱ्यां गरीबांना वीजपुरवठा होऊ शकणार नाही. त्यातून भविष्यात ग्राहकांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागेल, अशी भीती नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

काळया फिती लावून निवेदन देतेवेळी कारंजा येथील विविध सामाजिक संघटनांचे पदाधिकारी व वीज ग्राहक उपस्थित होते. कारंजा वीज वितरण कंपनीचे कार्यकारी उप अभियंता श्री. राजूरकर यांनी निवेदन स्वीकारले.

रोगापेक्षा इलाज भयंकर

'वीजचोरी रोखण्याच्या उद्देशाने महावितरणने स्मार्ट प्रीपेड वीज मीटर बसविण्याचा निर्णय घेतला असे म्हटले जाते. मात्र हा रोगापेक्षा इलाज भयंकर असा प्रकार आहे. सर्वसामान्यांकडून विरोध होत असूनही खासगी कंपन्यांच्या हितासाठी वीज वितरण कंपनी स्मार्ट मीटर का लावत आहेत ? पूर्वी मीटर मार्केट मधून खरेदी करण्याचा वीज ग्राहकांना पर्याय उपलब्ध होता. आता तो पर्याय मात्र नवीन धोरणात नाही. ही मनमानी आम्हाला मान्य नाही.

शासनाने खाजगी कंपनीच्या हितापेक्षा लोककल्याणकारी धोरण अवलंबवावे. '

- विनोद चाफले
सचिव, कारंजा नागरी
समस्या संघर्ष समिती

छत्रपती शिवाजी महाराज व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या बद्दल आक्षेपार्ह विधान करणा-यावर गुन्हा दाखल करा

कोराडी ■ दिलीप येवले



कोराडी : छत्रपती शिवाजी महाराज व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या बद्दल आक्षेपार्ह विधान करुन सामाजिक शांतता भंग करणारा कलाकार राहुल सोलापूरकर यांचे विरोधात इर्दं दाखल करण्याच्या मागणीसाठी

शताब्दी बहुउद्देशीय संस्थे तर्फे नागपूर जिल्ह्यातील महादुला कोराडी येथे शताब्दी बहुउद्देशीय संस्था अध्यक्ष रत्नदीप रंगारी यांच्या नेतृत्वात आंदोलन करण्यात आले. तसेच

कोराडी पो. स्टे. चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रविण पांडे यांना आपल्या मागण्यांचे निवेदन दिले. याप्रसंगी संजय रामटेके, अनिल पखिड्डे, अमरदीप हाडके, नागसेन ऊके, सचिन डुले, बादल हाडके प्रविण उगले, सिद्धार्थ खोब्रागडे, प्रदिप खोब्रागडे, कैलास शेंडे, शंकर छत्री, अभी बंसोड, दयाल साहु, रमेश सोमवंसी, कुणाल सोमकुंवर, बबलु मसकरे, चंद्रकांत जनबोधकर, सतिश चिमणकर दिलीप लशक्रे, बापु दवने, रवी भोयर, नरेंद्र सोनेकर बाँबी खुरे आदीं उपस्थित होते.

आष्टी पोलिस स्टेशन व महसूल विभाग यांनी शिवजयंती उत्साहानिमित्त शांतता कमिटीची घेतली संयुक्त बैठक

साहूर ■ शरद वरकड



साहुरः आष्टी तालुक्यातील सर्व गावांमध्ये मोठ्या उत्साहात शिवजयंती साजरी करण्यात येतात त्या पार्श्वभूमीवर आष्टी पोलिस स्टेशन व महसूल विभाग यांच्या संयुक्त विद्यमानाने सर्व आयोजकांची व शांतता कमिटीची बैठक घेण्यात आली. यावेळी पोलीस उपविभागीय अधिकारी डी. सी. खंडेराव,आष्टी पोलिस स्टेशनचे ठाणेदार राजेश जोशी ,पोलीस उपनिरीक्षक राजेश उंदीरवाडे , महसूल विभागाच्या नायब तहसीलदार भागवत मॅडम, पोलीस शिपाई नंदकिशोर वाढवे, सचिन ढाले, अमोल कठाणे उपस्थित होते. नायब तहसीलदार भागवत मॅडम यांनी आयोजकांना मार्गदर्शन केले आयोजकांनी कशाप्रकारे शिवजयंतीच्या कार्यक्रमाचे नियमाला अनुसरून नियोजन करावे याची माहिती सर्वांना दिली. तसेच परवानगीचे पत्र आयोजक यांनी सोबत ठेवावे असे सुचविले. त्याचप्रमाणे शांतता कमिटी व आयोजन समिती बैठकीचे अध्यक्ष पोलीस उपविभागीय अधिकारी डी. सी. खंडेराव यांनी कायदा व सूव्यवस्था बिघडणार नाही तसेच सोशल मीडिया वरील अफ़वा मुळे तरुण वर्ग भरकटून गुन्हेगारी कडे जाऊ शकतो यावर मार्गदर्शन केले. तसेच आयोजकांनी पोलीस यांच्याशी समन्वय ठेवावा. कुठल्याही थोर महात्म्यांच्या जयंतीला गालबोट लागणार नाही याची दक्षता घेण्याच्या सूचना यावेळी करण्यात आल्या या मीटिंगमध्ये आष्टी तालुक्यातील सर्व पत्रकार बंधू, नागरिक तसेच शिवजयंतीचे आयोजक उपस्थित होते. यामध्ये ॲडोकेट राहुल गजरे, युसुफ सर, सय्यद सर, उस्मान भाई, यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती कार्यक्रम बाबत सूचनापर मनोगत व्यक्त केले तसेच इतर पत्रकार व नागरिक उपस्थित होते व उपस्थितांपैकी आयोजकांनी आपल्या समस्या मांडल्या त्यावर चर्चा होऊन छत्रपती शिवाजी महाराज जयंती शांतातपूर्वक साजरी करण्यात यावी या सूचनेने व आष्टी पोलीस स्टेशन चे ठाणेदार राजेश जोशी यांच्या आभार प्रदर्शन ने बैठकीची सांगता झाली.

ङ्जनता विद्यालय, मंगरूळ येथे दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी निरोप समारंभाचे आयोजन

मंगरुळ ■ प्रतिनिधी



मंगरूळ : जनता विद्यालय व कला कनिष्ठ महाविद्यालय मंगरूळ येथे वर्ग १० वी तील विद्यार्थ्यांसाठी निरोप समारंभाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी राजेन्द्र डागा,अध्यक्ष, लोक शिक्षण. मंडळ, हिंगणघाट तर प्रमुख पाहुणे म्हणून शिखरचंदजी मुनोत, उपाध्यक्ष, लोक शिक्षण मंडळ, हिंगणघाट, सौ, संध्याताई डागा, सदस्या, लोक शिक्षण मंडळ, हिंगणघाट, जेष्ठ पत्रकार शांतीलाल गांधी, माजी प्राचार्य मनोहर कोल्हे, प्राचार्य अरुण काचोळे, माजी शिक्षक श्री. दिलीप साठोणे उपस्थित होते.

कार्यक्रमाला उपस्थित पाहुण्यांनी विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी शुभेच्छा दिल्या. अध्यक्षीय भाषणामध्ये संस्थाध्यक्ष राजेंद्र डागा यांनी समुद्रपूर तालुक्यातून शाळेच्या उत्तरोत्तर प्रगती बाबत अपेक्षा व्यक्त केली. प्राचार्य अरुण काचोळे यांनी विद्यार्थ्यांना कॉपीमुक्त अभियानाबाबत माहिती देत परीक्षेच्या शुभेच्छा दिल्या.

वर्ग १० वी च्या विद्यार्थ्यांनी शाळेला संस्थापक अध्यक्ष स्व. सोभागमलजी डागा यांची प्रतिमा भेट दिली. कार्यक्रमाचे संचालन कु. जिवतोडे यांनी तर आभार प्रदर्शन महेंद्र कोसुरकर यांनी केले. यावेळी कार्यक्रमाला सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

काटोल टोल नाका आंदोलनातून शिवसैनिकाची निर्दोष मुक्तता

विजय महाजन , ॲडव्होकेट दिपकजी केने , ॲडव्होकेट निलेश हेलोडे यांची महत्वाची भूमिका



काटोल ■ प्रशांत पवार

काटोल : काटोल टोल नाका लावल्यानंतर सर्व काटोल वासीयांना टोल लागत असे या विरुद्ध काटोल मधील शिवसैनिक दिपकजी रेवतकर, , तिलक क्षीरसागर, विपूल देवपूज्यारी. लक्ष्मण बागडे यांनी ५-०५-२०१४ मध्ये आंदोलन केले होते यात या सर्व शिवसैनिकान वर गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल झाले होते व यांना अटक झाली होती. या आंदोलनाचे फलित म्हणून काटोल च्या नागरिकांना टोल मुक्त झाले होते हे विशेष. यावेळी भारतीय जनता पक्षाचे अध्यक्ष विजय महाजन यांनी या सगळ्या शिवसैनिकांची जमानत घेतलेली होती तसेच मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांचे कडे सगळ्यांची मुक्तता करावी अशी विनंती सुद्धा केली होती. यामध्ये ?डव्होकेट दीपकजी केने यांनी महत्त्वाची भूमिका निभावून दिनांक १२-०२ -२०२५ रोजी योग्य युक्तिवाद करून या टोल नाका आंदोलनाच्या खटल्यातुन सर्वांची निर्दोष मुक्तता करण्यात यशस्वी झाले याबद्दल श्री दीपकजी रेवतकर, विपुल देवपुजारी, लक्ष्मणजी बागडे, तिलक क्षीरसागर यांनी एडवोकेट श्री दिपकजी केने व जमानत घेणारे विजय महाजन यांचे आभार म्हणले व त्यांना धन्यवाद दिला.

ग्राम विकास विद्यालयात १० वी च्या विद्यार्थ्यांना निरोप समारंभ

काटोल ■ प्रशांत पवार



काटोल : रिधोरा येथील ग्राम विकास विद्यालयात वर्ग १० वी च्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ दिनांक १३ फेब्रुवारी, गुरुवार रोजी आयोजित करण्यात आला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक श्री. एन. एस. बोलके तर प्रमुख अतिथी म्हणून शाळेच्या संचालिका डॉ. प्रा. सौ. वैशालीताई टालाटूले व पत्रकार श्री. प्रशांतजी पवार हे उपस्थित होते. मा. मुख्याध्यापक यांनी विद्यार्थ्यांना शिक्षण मंडळाच्या कापीमुक्त अभियाना बाबत माहिती दिली व भयमुक्त वातावरणात परीक्षा द्यावी असे आवाहन केले.

पत्रकार प्रशांत पवार यांनी वर्ग दहावी नंतर पुढील करियरच्या संधी काय आहेत त्याबाबतचे मार्गदर्शन करून परीक्षे साठी शुभेच्छा दिल्या. प्रमुख अतिथी लाभलेल्या शाळेच्या संचालिका डॉ. प्रा. सौ. वैशालीताई टालाटूले यांनी विद्यार्थ्यांना जीवनातील नैतिक मूल्ये व आदर्शबाबत समज दिली. विदयार्थ्यांनी कठोर मेहनत करून आई वडिलांचे, शाळेचे, शिक्षकांचे व स्वतःचे नाव मोठे करावे असे आवाहन केले. या प्रसंगी श्री. मोहोड सर, श्री. गोलाईत सर यांनी विद्यार्थ्यांना भावी जीवनाच्या वाटचालीबाबत मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी श्री. बल्की सर, श्री. साबळे सर, सौ. भक्ते मॅडम, सौ गमे मॅडम, श्री. तिडके बाबूजी, धनराजजी उमाळे, देविदासजी सुरजुसे यांनी सुद्धा सहकार्य केले.

वर्ग दहावी चे विद्यार्थी भावेश पाटोडे व दामिनी तभाने या विद्यार्थ्यांनी सर्व गुरुजनाचे आभार मानले व शाळेची उच्च परंपरा टिकवून ठेवू अशी ग्वाही दिली. कार्यक्रमाचे संचालन समीक्षा उईके व उन्नती दीडशे तर आभार संकेत वानखेडे यांनी केले.

रिधोरा व आजूबाजूच्या गावात अलीबाबा चालीस चोर सदृश्य टोळी सक्रिय असल्याची दाट शक्यता;काही तृतीय पंथी तर काही भिकारी तर काही व्यापाराच्या उद्देशाने गावभर घुमुन गावात चोरी करण्याच्या उद्देशाने वावरतात

काटोल ■ प्रशांत पवार



काटोल : गेल्या अनेक वर्षापासून तर आतापर्यंत रिधोरा व आजूबाजूच्या गावात चोरीचे प्रमाण अतिशय वाढलेले असून यावर नियंत्रण आणण्याचे गरज आहे गाडीच्या बॅटऱ्या चोरी जाणे शेतातील सामान चोरीला जाणे कापूस संत्रा मोसंबी मोटर स्टार्टर केबल वायर तसेच घर फोडी दुचाकी चोरी जाणे यासारखे अनेक चोरीचे प्रकार या भागात घडतच असून जनता त्रस्त आहे मध्य रात्री नंतर दुचाकीचे सुसाट चालविण्याचे आवाज गल्ली गल्लीतून गेल्या अनेक वर्षापासून ऐकायला येते नेमक्या ह्या गाड्या कुणाच्या असतात असाही प्रश्न नागरिकांना पडलेला आहे. काही अवैध धंद्याचा वावर तर नाही ना अशीही शंका नागरिक करू लागलेले आहे. रिधोरा गावात काही महिला वेशांतर करून तर काही भिकाऱ्याचे सोंग घेऊन तर काही गोष्टी विक्रीला आणून गावभर घुमून गावातील चप्पे चप्पे माहीत करून रात्रीला सर्व माहिती त्यांच्या मोरक्याला तर देत नाही ना अशी चर्चा जोर धरू लागलेली आहे. काही दिवसा अगोदर रीधोरा येथे काटोल उपविभागीय पोलीस अधिकारी बापू रोहम तसेच काटोल पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक निशांत मेश्राम यांनी या गावात मिटिंग घेऊन परिस्थितीचा आढावा घेतला होता. परंतु एक ना अनेक अशा चोरीच्या घटना दिवसेंदिवस घडत आहे त्यामुळे या भागात अलीबाबा चालीस चोर सदृश्य परिस्थिती निर्माण करणारी टोळी तर सक्रिय नाही ना अशी जोरदार चर्चा पंचक्रोशीत व्हायला लागली आहे पोलीस विभागाने गाडी चोरी घरफोडी यासह इतर गोष्टीचा छडा लावला असून सुद्धा नवीन नवीन चोरीचे प्रकार या भागात घडत आहे त्यामुळे जनतेमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झालेले असून यावर शासनाने योग्य तोडगा काढून भयमुक्त जीवन जगण्यासाठी पोलीस प्रशासनाकडे असलेल्या अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर चोरांवर जबर बसवण्यासाठी करावा अशी मागणी रीधोरा भागातील नागरिकान कडून जोर धरू लागलेली आहे .

मौजा कोठोडी, पटकाखेडी, , पंडराखेडी, येथील वेकोली प्रकल्पग्रस्तांना न्याय मिळवून द्या : राजेश रंगारी

कोराडी ■ दिलीप येवले



कोराडी : सावनेर तालुक्यातील मौजा - कोठोडी, पंधराखेडी, पटकाखेडी येथील शेतीयुक्त शेतजमीन वेकोली ने अधिग्रहित केली असून अध्याप ही उर्वरित ११४प्रकल्पग्रस्त मुलांना वेकोली ने विनाविलंब कोणत्याही भूलथापा न देता तात्काळ नोकरी द्यावी या वेस्टर्न कोल फील्ड प्रकल्पग्रस्त समितीच्या पीडित नागरिकांना भेटून आपण राज्याचे महसूलमंत्री, ना चंद्रशेखर बावनकुळे,आ, आशिष देशमुख, सावनेर कळमेश्वर वी, स क्षेत्र, जिल्याचे बी जे पी चे नेते डॉक्टर राजीव पोतदार यांचेशी चर्चा करून अती जलद या पुनर्वसन बाधित नागरिकांचा अती जिव्हालाचा प्रश्न सोडवनार आहे अशी माहिती त्यांनी पत्रकारबांधवांना दिली

प्राप्त माहिती नुसार मौजा कोटोडी,, एरंगनगाव, पटकाखेडी, पंधराखेडी येथिल शेतकऱ्यांच्या उपजाऊ जमिनी एकुन आरजी क्षेत्र ३२१.१३हेक्टर यू जी - २,ओ. सी एम खान यांनी २६/०६/२०२२रोजी अधिग्रहित केलेली असतांनी अध्यापी ११४प्रकल्पग्रस्त व्यक्ती, आणि त्यांच्या वारसांना नोकरी दिलेली नाही त्यामुळे उपरोक्त गावातील भुमिमालक/आणि त्यांच्या वारसांना संघर्ष सतत ४वर्श्यापासान सुरू आहे २०२२मद्ये महायुतीचे शासन असताना सुद्धा मी या नागरिकांच्या संघर्षात सहभागी झालेलो होतो त्यावेळी मी आणि नागपूर जील्ह्याचे नेते डॉक्टर राजीव पोतदार यांनी तीव्र लढा देऊन त्यावेळी २००मुलांना रोजगार मिळवून दिला अजूनही ११४प्रकल्पग्रस्त व्यक्ती, आणि त्यांचे वारस नोकरी चे प्रतीक्षेत आहेत त्यांचेसाठी देखील त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी महाराष्ट्र शासनचे महसूलमंत्री तथा पालकमंत्री ना, चंद्रशेखर बावनकुळे यांना विनंती करून केंद्रीय कोयला मंत्री कडे मध्यस्ती करण्यासाठी मी विनंती करणार आहे

प्रकल्पग्रस्त वेस्टर्न कोल फील्ड संघर्ष समिती च्या मागण्या खालीलप्रमाणे १ मा, उच्च न्यायालय चे सन २०१२, व आर, आर, पॉलिसी अन्वये व को, ली ने नोकरी देणे क्रमप्राप्त आहे त्याची अंमलबजावणी करणे

२, तसेच ७/१२आणि नमुना - ८आ, अनुसार भूमिमालक, आणि त्यांच्या वारसांना जमिनीचा उचित मोबदला देणेबाबत १५दिवसाच्या आत प्रस्तावै ,म,त कडे प्रलंबित आहे तात्काळ प्रकल्पपिदितांना नोकरी देण्यात यावी

.३, सार्वजनिक बांधकाम विभाग मार्फत मौजा कोटोडी , एरणगाव येथील गावातील सर्वच घरांचा सर्व्हे पुन्हा करण्यात यावा

४, मौजा कोतोडी, एरणगाव चे पुनर्वसन हे सावनेर ते नागपूर रोड वर करण्यात यावे

या व इतर महत्त्वाच्या बाबी वर आपण स्वतः प्रकल्पग्रस्त किसान समितीच्या मोर्च्यात सहभागी होऊन न्याय मिळउन देण्याबाबत १००टक्के पूर्ण ताकतीने प्रयत्न करणार असे आर्श्वस्त केले तसेच ै म,त प्रशासनाने तात्काळ नोकरी दिली नाहीतर आपन तीव्र आंदोलन करण्याचा इशारा ही यावेळी दिला आहे यावेळी त्यांचे समवेत राजेश रंगारी, नगर अध्यक्ष समवेत, जी, प, सदस्य सुरेन्द्र शेंडे, युवा नेते, प्रणय सोनसरे, सामाजिक कार्यकर्ते प्रशांत भोंगडे यांची उपस्थिती होते.

आरोही क्लासिक २०२५ बॉडीबिल्डिंग चॅम्पियनशिप यशस्वीपणे संपन्न

नागपूर ■ दिलीप येवले



नागपूर : नागपूरचे सीनियर बॉडीबिल्डर रोहित साहू आपल्या मुलीच्या जन्मदिनी दरवर्षी आरोही क्लासिक आयोजन करतात हा आरोही क्लासिकचा चौथ वर्ष म्हणजे सीझन फोर होता. या स्पर्धेत सुमारे २०० प्रतिस्पर्धी संपूर्ण भारतातून आले होते. त्यात गोवा, मध्य प्रदेश, दिल्ली, मुंबई, पुणे, छत्तीसगड, गुजरात, झारखंड या राज्यांनी विशेष लक्ष वेधून घेतले आणि या स्पर्धेत शीर्ष स्थानावर राहिले. मध्य प्रदेशाने सर्वाधिक गोल्ड मेडल्स मिळवले. दुसऱ्या स्थानावर महाराष्ट्र आणि तिसऱ्या स्थानावर गोवा राहिला. कोच राहुल सरीन, कोच किशन तिवारी, कोच निवेद शेतकर, कोच रवि परसेकर, कोच दानिश खान यांना विशेष सन्मान प्राप्त झाला. स्पर्धेचे आयोजन यशस्वीपणे करण्यासाठी पाल फिटनेस, एस एन फिटनेस, ईशान फिटनेस, मॉन्स्टर फिटनेस, सिंह फिटनेस, विराज फिटनेस आणि अरेना जिम यांचा विशेष सहयोग मिळाला. डॉ. मेघना तिड्के यांच्या अरोमा हर्बलच्या वतीने महिला फिटनेस श्रेणीसाठी विशेष पुरस्कार देण्यात आला. प्लॅटिनम न्यूट्रिशन आणि एरिक न्यूट्रिशन यांच्या वतीने २ लाखांपेक्षा अधिक सप्लीमेंट्स आणि न्यूट्रिशन स्टॅक्स वाटप करण्यात आले. मध्य प्रदेशमधून बादल शर्मा, सफायत उल्ला आणि दिल्लीमधून सर आणि अनिरुद्ध सर हे विशेष निर्णायक होते. मिस्टर वर्ल्ड मंगेश गावडे, दर्शना जाधव यांच्या हिंदवी स्वराज, छावा महाबली हनुमान, जय श्रीराम या विशेष प्रस्तुत्या होत्या. स्पर्धेचे आयोजन मिस वर्ल्ड अल्फिया शेख आणि मिस्टर इंडिया कांतिश हाडके यांनी केले. व्यवस्थापन टीमचे प्रमुख कुलदीप चिकाने आणि मनीषा धमदे यांनी यशस्वी आयोजन केले.

जिद्द, सातत्य, सचोटी आणि प्रामाणिकपणाला कष्टाची जोड असेल तर हमखास यश मिळते : श्री गणेशराव वाघ

शाळेतून दिल्या जाणाऱ्या संस्कारावरच विद्यार्थ्याचे पुढील भविष्य घडते-सौ.सुदामतीताई वाघ
श्री महालक्ष्मी माध्यमिक विद्यालयात दहावीच्या विद्यार्थ्यांना निरोप!

बीड ■ प्रतिनिधी

बीड : जिद्द, सातत्य, सचोटी आणि प्रामाणिकपणाला कष्टाची जोड असेल तर जीवनात हमखास यश मिळते. विद्यार्थ्यांनी आपला अमूल्य असा वेळ मोबाईलमध्ये वाया न घालवता वाचनाकडे लक्ष देऊन आपलं ध्येय गाठावे, गरज पडेल तेंव्हा आम्ही सर्व तुमच्या पाठीशी आहोत तुम्ही प्रचंड अभ्यास करून जीवनात उज्ज्वल यश मिळवावे असा सल्ला शिवनेरी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष तथा आदर्श मुख्याध्यापक श्री गणेशराव वाघ सरांनी शिदोड येथील श्री महालक्ष्मी माध्यमिक विद्यालयात दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आलेल्या निरोप समारंभाच्या कार्यक्रमाप्रसंगी मार्गदर्शन करताना दिला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेच्या संस्थापक अध्यक्षा सौ. सुदामतीताई वाघ या होत्या. तर व्यासपीठावर गावातील ज्येष्ठ नागरिक श्री दिलीप नाना जोगदंड, सौ शालिनीताई जोगदंड, श्री मिथुन जोगदंड, नुकताच एमपीएससी परीक्षा उत्तीर्ण झालेला शाळेचा माजी विद्यार्थी चि. शैलेश जोगदंड, शाळेचे मुख्याध्यापक श्री दत्तात्रय चव्हाण सर, श्री आत्माराम वाव्हळ सर, श्रीमती फाटे मॅडम, श्रीमती सानप मॅडम आदी उपस्थित होते.



बीड शहरापासून जवळ असलेल्या शिदोड येथील श्री महालक्ष्मी माध्यमिक विद्यालयात काल मंगळवार दि.१८ फेब्रुवारी रोजी दहावीच्या विद्यार्थ्यांना निरोप समारंभ आणि एमपीएससी परीक्षा उत्तीर्ण झालेला शाळेचा माजी विद्यार्थी चि.शैलेश जोगदंड याचा सत्कार समारंभ कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिवनेरी शिक्षण प्रसारक मंडळाच्या संस्थापक अध्यक्षा सौ. सुदामतीताई वाघ ह्या होत्या. कार्यक्रमाच्या सुरुवातीला क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर आलेल्या मान्यवरांचा सत्कार स्वागत गीतासह पुष्पगुच्छ शाल आणि श्रीफळ देऊन करण्यात आला. या सत्कार समारंभानंतर इयत्ता नववी वर्गातील कु. अमृता पाखरे आणि कु. आलिशा शेख यांनी दहावीच्या विद्यार्थ्याबाबत आपले मनोगत व्यक्त करत शुभेच्छा दिल्या. तर इयत्ता दहावीच्या सर्व विद्यार्थ्यांच्या वतीने कु. प्रणाली पदमुले हिने मनोगत व्यक्त केले. तसेच प्रमुख पाहुणे श्री मिथुन जोगदंड यांनी दहावीच्या विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. त्यानंतर शाळेचा माजी विद्यार्थी चि. शैलेश जोगदंड यांने सत्काराला उत्तर देताना आपल्या यशामध्ये आई-वडिलांसोबतच शाळेचा आणि शिक्षकवृंदांचा मोठा वाटा असल्याचे सांगितले. आपण आयुष्यात आपल्या शिदोड गावाला आणि श्री महालक्ष्मी माध्यमिक विद्यालयाला कधी ही विसरणार नाही. शाळेसाठी माझी गरज लागेल तेव्हा मदतीसाठी सदैव तत्पर राहील अशी ग्वाही या वेळी शैलेश जोगदंड यांने दिली.

त्यानंतर संस्थेचे अध्यक्ष श्री गणेशराव वाघ सर यांनी विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन केले. यावेळी बोलताना संस्थाचालक श्री गणेशराव वाघ साहेब म्हणाले की, प्रत्येक विद्यार्थ्यांच्या जडणघडणीत आई-वडील आणि शिक्षकांचा मोठा वाटा असतो. सध्याच्या वातावरणात परिस्थितीमध्ये अनेक विद्यार्थी मोठ्या प्रमाणात व्यसनाधीन झाले आहेत. आपण मात्र या व्यसनापासून दूर रहावे.

कोणत्याही प्रकारचे व्यसन करू नये. दररोज सकस व संतुलित आहार घ्यावा. आजचे अनेक विद्यार्थी मोबाईलच्या व्यसनाच्या विळख्यात मोठ्या प्रमाणात विद्यार्थी अडकले आहेत. आपण वेळीच सावध झाले पाहिजे. मोबाईलचा गरजेपुरताच वापर करावा. या मोबाईल पेक्षा थोर साधू, संत, विचारवंत आणि महापुरुषांच्या पुस्तकांचे वाचन करावे. आपले करिअर घडवण्यासाठी लक्ष केंद्रित करावे. जिद्द, सातत्य, सचोटी आणि प्रामाणिकपणाला कष्टाची जोड असेल तर हमखास यश मिळते हे तत्त्व कायम लक्षात ठेऊन अभ्यास करून आई-वडिलांचे, आपल्या शाळेचे, आपल्या गावाचे नाव उज्ज्वल करावे. विद्यार्थ्यांना जीवनात जेंव्हा आमची गरज पडेल, तेव्हा आम्ही आपल्यासाठी सदैव तत्पर राहून तुम्हाला मदत करू असा दिलासा दिला. शिवाय या वेळी त्यांनी दहावीच्या विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप करताना संस्थेच्या संस्थापक अध्यक्षा सौ. सुदामतीताई वाघ यांनी विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन केले. यावेळी त्यांनी विविध उदाहरणे दाखले आणि गोष्टी सांगितल्या. शाळेतून दिल्या जाणाऱ्या संस्कारावरच विद्यार्थ्याचे पुढील भविष्य घडते. असे सांगत दहावीच्या विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी आणि भावी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री आत्माराम वाव्हळ सर यांनी केले. तर आभार दत्तात्रय चव्हाण सर यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले. यावेळी दहावीचे विद्यार्थी कु. प्रणाली पदमुले आणि चि. संतोष पदमुले या बहिण भावांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीच्या पूर्वसंध्येला शाळेला छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा भेट दिला. सदरील पुतळा आणि दहावीच्या सर्व विद्यार्थ्यांनी शाळेला खुर्चांची दिलेली भेट मान्यवरांच्या शुभ हस्ते स्वीकारण्यात आली. अल्पोहारा नंतर कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

परळी पंचायत समिती कडून प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) ची उद्धिष्ट पूर्ती

परळी ■ प्रतिनिधी

परळीः ग्रामीण भागासाठी असणारी प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण २०२४-२५ चे परळी पंचायत समितीचे प्रथम अग्रीम २० फेब्रुवारी पर्यंत देण्याचे उद्दिष्ट पूर्ण झाले असून २९१२ लाभार्थ्यांना प्रथम अग्रीम देण्याची तयारी पूर्ण झाली आहे . आपले उद्दिष्ट पूर्ण करण्यामध्ये जिल्ह्यातील वडवणी, शिरूर, पाटोदा आणि आता परळी या तालुक्यांनी बाजी मारली आहे.

परळी पंचायत समिती साठी प्रधानमंत्री आवास योजनेचे एकूण उद्दिष्ट ६०३४ असून त्यापैकी प्रथम अग्रीम देण्यासाठी पी टी आर ,जागेचा मालकी पुरावा व आधार कार्ड घेण्यात येत असून या आधारे मंजुरी आणि प्रथम अग्रीम देण्याची कारवाई सध्या सुरू आहे. या कामासाठी सरपंच, ग्रामसेवक, ग्राम रोजगार सेवक यांची मोठ्या प्रमाणात मदत होत आहे. पी टी आर आणि आधार गोळा करण्यासाठी या सर्वांनी प्रशासनास गतीने सहकार्य केल्याने घरकुलास प्रथम अग्रीम देण्याचे उद्दिष्ट आपण वेळेत पूर्ण करू शकलो.

तालुक्यातील ज्या लाभार्थ्यांना स्वतःच्या मालकीची जागा नाही, अशा लाभार्थ्यांना शासनाची पंडित दीनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय योजना आहे. या योजनेतून जागा खरेदी केल्यास १ लाख रुपये पर्यंतचे अर्थसहाय्य केले जाते. यामुळे ज्या लाभार्थ्यांना स्वतःची जागा नाही, भूमीहीन आहेत. अशा लाभार्थ्यांनी ग्रामपंचायत मार्फत प्रस्ताव पंचायत समितीकडे सादर करावा. तो प्रस्ताव मंजूरी साठी जिल्हा परिषद कडे पाठवण्यात येईल असे आवाहन बीडिओ विठ्ठल नागरगोजे यांनी केले आहे.

राज्याचा कार्यक्रम पुण्यात गृहमंत्री मा. अमितजी शहा यांची उपस्थिती राज्यातील प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण मधील लाभार्थ्यांसाठी एकाच क्लिक वरती देशाचे गृहमंत्री अमित शहा यांच्या हस्ते १० लाख लाभार्थी चा खाते प्रथम हप्ता वाटपाचा कार्यक्रम २२ फेब्रुवारी रोजी पुणे येथे होत आहे. त्या त्या ग्रामपंचायत मध्ये ग्रामसभा, घेऊन कार्यारंभ आदेश देणे कार्यक्रम आणि त्याबरोबरच घरकुल बांधकामासाठीच मार्गदर्शन व योजने बाबतची सविस्तर माहिती ग्रामसभेत दिल्या जाणार आहे. त्याची तयारी आता पूर्णत्वास जात आहे.

चिकाटी व मेहनतीने शेतकरी पुत्राचे एमपीएससी परिक्षेत घवघवीत यश, सत्यनारायण ढाकणे यांची सहाय्यक महसूलपदी निवड

केज ■ प्रतिनिधी



केजः केज तालुक्यातील जोला येथील शेतकरी कुटुंबातील सत्यनारायण ढाकणे यांची एमपीएससी परिक्षेत घवघवीत यश मिळवुन नुकतीच महसूल सहाय्यक पदी निवड झाल्याबद्दल ग्रामस्थांच्या वतीने भव्य सत्कार करण्यात आला व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या वतीने महसूल सहाय्यक पदासाठी घेण्यात आलेल्या परीक्षेत शेतकरी कुटुंबातील सत्यनारायण ढाकणे यांनी घवघवीत यश संपादन केले असून या यशाने जोला ग्रामस्थांनी व कुटुंबातील नातेवाईकांनी आनंद उत्सव साजरा केला. यावेळी सत्कार करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. यावेळी बरड फाटा येथे आनंदोत्सव साजरा करण्यात आला, रामदास मुंडे, डॉ.बाबा ढाकणे,संदिप ढाकणे, पांडुरंग आंधळे, करण आबा मुंडे, दिनेश मोराळे, संपादक अशोक नागरगोजे उपस्थित होते, यांच्या सह मित्रपरिवार व नागरिकांतुन मोठ्या संख्येने अभिनंदन होत आहे.

केज येथे शिव साम्राज्य शिवजन्मोत्सव आयोजित रक्तदान शिबिरात १०० रक्तदात्यांचे रक्तदान



केज ■ प्रतिनिधी

केज : केज शहरात छत्रपती शिवराय जयंती निमित्त शिव साम्राज्य जन्मोत्सव समितीने मंगळवार रोजी रक्तदान शिबिर आयोजित केले.शिबिरात १०० रक्तदात्यांनी रक्तदान केले. सामाजिक उपक्रमाने केज येथील शिवजन्मोत्सव साजरा होत आहे.

शिव साम्राज्य शिवजन्मोत्सवाचे अमोल शिंदे, भैय्या शिंदे, सचिन रोडे, रवी दांगट, विलास आवाड, पपू ढगे, यशवंत रितापूरे, संजय गुंड,मुन्ना धनवडे, सागर डिकूळे,अशोक कदम, सारंग शिंदे, अतुल गुंड दुशांत लांब, अक्षय सत्वधर,आदित्य विडेकर, राहूल गुंड, अशोक रगडे, संतोष असवले अक्षय कदम, मयूर कदम, तुषार सत्वधर,रुद्र जाधव आदी सदस्यांनी शिबिराचे नियोजन केले.

रक्तसंकलनासाठी माजलगाव रक्तपेढी डॉ.ज्ञानेश्वर गिलबिले,डॉ.आर.टि. जाधवर, डॉ.हनुमंत वेताळ,टेक्निशियन मोहन गायकवाड, मनीषा हुरडूके,गणेश मेंडके, गणेश नागरगोजे आदींनी सहकार्य केले.

क्षेत्र मोर्वे येथील अमृता जगताप हिची महसूल सहाय्यक पदी निवड

खंडाळा ■ गणेश गुरव



खंडाळा : तीर्थक्षेत्र मोर्वे तालुका खंडाळा येथील माजी सरपंच कै.सदाशिव महादेव जगताप यांची नात आणि गुरुदत्त ज्ञानपीठ मोर्वे शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष तानाजी जगताप यांची कन्या कु. अमृता तानाजी जगताप ही महाराष्ट्र लोकसेवा आयोग मार्फत घेण्यात आलेल्या परीक्षेमध्ये उत्तीर्ण होऊन तिची महसूल सहाय्यक पदी निवड झाली.

अमृता ही गेली आठ वर्षापासून स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करीत होती परंतु स्पर्धा परीक्षेमध्ये थोड्या थोड्या गुणांसाठी तीला अपयश येत होते.परंतु अथक प्रयत्नानंतर यश मिळालेच आणि अमृताची महसूल सहाय्यक पदी निवड झाली.

अमृताचे प्राथमिक शिक्षण जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मोर्वे तर माध्यमिक शिक्षण माध्यमिक विद्यालय मोर्वे येथे झाले आहे. माध्यमिक विद्यालय मोर्वे शाळेच्या इयत्ता दहावी विद्यार्थ्यांच्या शुभचिंतन कार्यक्रम प्रसंगी अमृता हिचा संस्था,शिक्षक, शाळा व्यवस्थापन समिती सदस्य व ग्रामस्थ मोर्वे यांच्या वतीने सत्कार करण्यात आला.याप्रसंगी माजी सरपंच मल्हारी जगताप, गुरुदत्त ज्ञानपीठ शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष तानाजी जगताप पोलीस पाटील राहुल धायगुडे व्याख्याते विलास भोसले, शाळा व्यस्थापन समिती अध्यक्षा सौ राजश्री जाधव ,सदस्य निकम, जाधव,मुख्याध्यापक गुळदगड सर आणि शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी,ग्रामस्थ,विद्यार्थी उपस्थित होते.

अमृता जगताप हीचे गुरुदत्त ज्ञानपीठ मोरवे संस्थेचे अध्यक्ष रामराजे नाईक निंबाळकर, संस्थेचे सर्व पदाधिकारी आणि मंत्री मकरंद आबा पाटील यांनी अभिनंदन केले.

जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा तरनळी शाळेत संत सेवालाल यांची जयंती साजरी

केज ■ प्रतिनिधी



जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा तरनळी केंद्रलव्हुरी ता.केज या शाळेत शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष संपत्ती सरवदे, उपाध्यक्ष सीमा मोहिते व राजाभाऊ कदम अपग्रेड मुख्याध्यापक यांनी 'संत सेवालाल महाराज' व खगोलीय भौतिकीविज्ञ यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून पुजन केले.'संत सेवालाल' यांचा जन्म दि.१५ फेब्रुवारी १७३९ रोजी एक श्रीमंत घराण्यात झाला.वडील भीमा नाईक व आई धर्मली माता.संत सेवालाल यांचा जन्म श्रीमंत घराण्यात होऊनही त्यांनी बंजारा समाज मागासलेला असून अशिक्षित आहे तसेच अंधश्रद्धा यांमध्ये आहे.या मधुन बंजारा समाजास उपदेश करून सुधारणा करून त्यांना पुढे घेऊन जाण्यासाठी प्रयत्न केला पाहिजे.या विचाराने संत सेवालाल महाराज यांनी कार्य केले. १फेब्रुवारी ते २८ फेब्रुवारी या कालावधीत डॉ.एपीजे अब्दुल कलाम सायन्स क्लब उपक्रम अंतर्गत दैनिक एक शास्त्रज्ञाची माहिती विद्यार्थ्यांना देण्यात येते त्या अनुषंगाने जयंत नारळीकर यांचा जन्म १९ जुलै १९३८ रोजी कोल्हापूर येथे झाला. ते खगोलीय भौतिकीविज्ञ व गणितज्ञ होते.त्यांना १९६५ मध्ये 'पद्मभूषण' किताब देण्यात आला.गुरुत्वाकर्षण,विश्वोत्पत्तीशास्त्र इ.विषयावरील त्यांचे ७० हून अधिक संशोधनात्मक निबंध व लेख प्रसिद्ध झालेले आहेत.त्यांनी विज्ञान कथा लिहिल्या.विज्ञान विषयावर व्याख्याने देण्यात त्यांची विशेष ख्याती होती.अशी माहिती जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा तरनळी केंद्र लव्हुरी ता.केज शाळेचे अपग्रेड मुख्याध्यापक राजाभाऊ कदम यांनी दिली.या शाळेतील शिक्षक बाळासाहेब राठोड सर यांनी विशेष व सविस्तर माहिती दिली.

तसेच भारत हांगे सर, श्रीमती गिताताई अंडील मॅडम, आदर्श शिक्षिका श्रीमती सोनाली भुमकर मॅडम, प्रशिक्षणार्थी शिक्षिका सीमा मोहिते यांनीही आपल्या मनोगतातून सविस्तर माहिती दिली.

या कार्यक्रमास शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष संपत्ती सरवदे, उपाध्यक्ष सीमा मोहिते, सदस्या राधा खामकर,बाबासाहेब मैंद सर,पीएम पोषण शक्ती निर्माण योजनाचे कामगार गणेश माने, विद्यार्थी उपस्थित होते. या कार्यक्रमानिमित्त विदयार्थ्यांना गोड पदार्थ खाऊ वाटप करण्यात आला.कार्यक्रमाचे सुत्रसंचलन इ.७ वी वर्गाची विद्यार्थ्यांनी श्रध्दा संपत्ती सरवदे यांनी केले व आभार प्रियंका अशोक देटे यांनी मानले.

वेळ पडली तर आम्ही अन्नत्याग करु : सुप्रियाताई सुळे

सरपंच स्व.संतोष देशमुख यांच्या कुटुंबाची खासदार सुप्रियाताई सुळे यांनी घेतली सांत्वन पर भेट

केज ■ प्रतिनिधी



सरपंच स्व.संतोष देशमुख यांच्या कुटुंबाची खासदार सुप्रियाताई सुळे यांनी सांत्वन पर भेट घेतली आहे. देशमुख कुटुंबाचे सांत्वन करून माध्यमाशी बोलताना खासदार सुप्रियाताई सुळे सांगितले की,वेळ पडली तर आम्ही अन्नत्याग करु असे त्यांनी बोलताना स्पष्ट केले आहे.

याबाबतची सविस्तर माहिती अशी की,मंगळवार दिनांक १८ रोजी २०२५ मस्साजोग येथील युवा सरपंच कै. संतोष देशमुख यांच्या परिवारातील सदस्यांची खासदार सुप्रियाताई सुळे यांनी सांत्वन भेट घेतली आहे.

यावेळी त्या बोलताना म्हणाल्या की, कोणाला पटतय का? कृष्णा आंधळे सापडू शकत नाही, त्याचा सीडीआर काढा. फोन असा जातो कुठे? कृष्णा आंधळे आणि इतर आरोपींचा सीडीआर मिळालाच पाहिजे.

यासाठी आपण लढा लढू अस सुप्रिया सुळे म्हणाल्या. त्या पुढे बोलताना म्हणाल्या की, ही लढाई महिलांनी हाती घेतली पाहिजे. घ्या हातात लाटण, आमच्या घरातील पुरुषावर असे अन्याय करता? हा महाराष्ट्र अस सहन करणार नाही. तुम्ही अन्नत्याग करू नका, ही विनंती करते. वेळ पडली तर आम्ही अन्नत्याग करू. त्या तानाजी सावंत यांचा मुलगा सापडतो, पण संतोष देशमुखांचा खुनी सापडत नाही? तो गरीब, शोषित, पीडित आहे म्हणून आवाज नाही का त्याला? जोपर्यंत त्याला न्याय मिळत नाही, दोन्ही मुलांची जबाबदारी पवारांनी घेतली आहे, असही सुप्रिया सुळे म्हणाल्या.

यावेळी गावकऱ्यांनी बीडमधील आणि आजूबाजूच्या गावातील दहशतीबाबत माहिती सुप्रिया सुळेंना दिली. पोलिसांनी कशाप्रकारे हयगय करून हे प्रकरण दाबण्याचा प्रयत्न केला, याची माहितीही दिली. आजूबाजूच्या गावातील इतर गुन्ह्यांविषयीही गावकऱ्यांनी सांगितल. एकूणच बीडमधील सामाजिक आणि राजकीय परिस्थिती चिघळल्याची अनेक उदाहरण गावकऱ्यांनी सुप्रिया सुळेंना दिली असून या सर्व प्रकरणात महिला म्हणून गावकऱ्यांच्या पाठिशी असल्याच त्या म्हणाल्या. तसेच, या प्रकरणात राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून फार मोठ्या अपेक्षा होत्या. त्यांच्या भेटीची वेळ मागितली असून बजरंग सोनावणे आणि मी जाऊन त्यांची भेट घेणार आहोत, असही सुप्रिया सुळे म्हणाल्या. स्वर्गीय संतोष देशमुख यांच्या कुटुंबियांना न्याय मिळेपर्यंत आम्ही स्वस्त बसणार नाहीत वेळप्रसंगी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे ओटी पसरून संतोष देशमुख यांच्या कुटुंबियांना न्याय मागणार आहे असे बोलताना खासदार सुप्रियाताई सुळे यांनी स्पष्ट केले आहे.

मराठा सेवा संघाचे मराठा भूषण पुरस्कार जाहीर!

बीड ■ प्रतिनिधी



बीड : मराठा सेवा संघ बीड व अंतर्गत सर्व कक्ष यांच्या वतीने दरवर्षी शिवजन्मोत्सव सोहळा मोठ्या उत्साहात साजरा केला जातो या वर्षीही शिवजन्मोत्सव सोहळा दि. २१/२/२०२५ वार शुक्रवार रोजी ठीक सायं. ७ वा यशवंतराव चव्हाण नाट्यगृह बीड या ठिकाणी संपन्न होत आहे.कार्यक्रम प्रसंगी विविध क्षेत्रात कार्यरत समाजातील तळागाळातील व्यक्तीसाठी योगदान देणाऱ्या समाज रत्नांचा मराठा भूषण पुरस्कार देऊन विशेष गौरव करण्यात येणार आहे.

शिवजन्मोत्सव सोहळ्यात मराठा भूषण पुरस्काराने सामाजिक व उद्योग क्षेत्रात अतुलनीय कार्य करणारे रमेश भाऊ पोकळे तर वैद्यकीय क्षेत्रात भरीव कामगिरी करणारे प्रसिद्ध स्त्रीरोगतज्ञ डॉ.शरद शिंदे यांना मान्यवरांच्या हस्ते मराठा समाजभूषण पुरस्कार देवून गौरव करण्यात येणार आहे.

यावेळी प्रसिद्ध विचारवंत ज्ञानेश महाराव यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे.या कार्यक्रमाचे उद्घाटक बीड जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.शिवश्री अशोक थोरात साहेब तर कार्यक्रमाचे अध्यक्ष शिवश्री डॉ.ज्ञानेश मोकाटे उपमुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड हे असून प्रमुख उपस्थिती मध्ये शिवश्री एल.पी.गळगुंडे जिल्हा कोषागार अधिकारी बीड,शिवश्री चंद्रकांत शेळके तहसीलदार बीड,शिवश्री प्रवीणकुमार वानखेडे गटविकास अधिकारी बीड,शिवश्री अशोक ठाकरे विभागीय अध्यक्ष मराठा सेवा संघ यांची उपस्थिती राहणार आहे.या सर्व मान्यवरांच्या उपस्थिती मध्ये शिवश्री रमेश पोकळे,शिवश्री डॉ शरद शिंदे यांना मराठा समाजभूषण पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. तरी सर्व शिवप्रेमींनी शिवजन्मोत्सव व मराठाभूषण पुरस्कार सोहळ्यास उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी असे आवाहन मराठा सेवा संघ बीड,संभाजी ब्रिगेड व अंतर्गत सर्व कक्षाच्या वतीने करण्यात येते.

जनप्रभात हे दैनिक पत्र मालक, प्रकाशक,मुद्रक : संपादक राहुल ज्ञानेश्वरराव गजरे यांनी रुतुजा प्रिंटर,नवीन आष्टी ता.आष्टी जि.वर्धा ४४२२०२ येथे मुद्रीत करुन साप्ताहिक जनप्रभात कार्यालय,नवीन आष्टी ता.आष्टी जि.वर्धा ४४२२०२ येथे प्रसिध्द केले. भ्रमणध्वनी ७८७५६१३६१९ (या पत्रकातील सर्व माहितीशी संपादक,मालक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद वर्धा न्यायालयांतर्गत) RNI NO : MAHMAR/2022/82242